shikshan Prasarak Sanstha's

**Padmbhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathemahankal**

**Department of Political Science**

**M.A. Part – I, Sem – I**

**Study Material**

**Subject Name: - ME - I, Foreign Policy**

**Teachers Name: Dr. Somanath D. Hubale**

## घटक क्र. १

## भारतीय परराष्ट्र धोरणाचे वैचारिक आधार

**प्रास्ताविक :**

भारताचे परराष्ट्र धोरण हे भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण, आंतरराष्ट्रीय शांतता व स्थैर्य राखणे, आर्थिक-राजकिय सहकार्य वाढवणे व जागतिक पातळीवर भारताची भूमिका मजबूत करणे या उद्दिष्टांवर आधारित आहे. खालील मुद्द्यांमध्ये त्याचे सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे.

**१. परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्त्वे:**

भारताचे परराष्ट्र धोरण खालील प्रमुख तत्त्वांवर आधारलेले आहे.

**अ) पंचशील तत्त्वे:**

पंडित नेहरूंनी सन 1954 मध्ये चीनबरोबर मांडलेली पंचशील तत्त्वे भारताच्या धोरणाचा पाया मानली जातात. १) परस्पर सार्वभौमत्व व प्रादेशिक अखंडतेचा आदर, २) परस्पर आक्रमण न करणे, ३) परस्पर हस्तक्षेप न करणे, ४) समानता व परस्पर फायदा, ५) शांततापूर्ण सहजीवन

**ब) अहिंसा व शांततावाद:**

महात्मा गांधींच्या मते ,वाद टाळून सामोपचाराने समस्या सोडवणे. अहिंसा व शांततावाद ही भारताच्या परराष्ट्र धोरणाची मूलभूत तत्त्वे आहेत महात्मा गांधींच्या अहिंसेच्या विचारांचा भारताच्या आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनावर खोल प्रभाव पडलेला आहे. आंतरराष्ट्रीय वादविवाद युद्धाऐवजी संवाद व वाटाघाटींनी सोडवणे, शक्तीपेक्षा नैतिक मूल्यांवर भर, मानवतेचा व मानवी हक्कांचा सन्मान, जागतिक शांतता व सहअस्तित्वाला प्रोत्साहन, अण्वस्त्रांचा विरोध व निशस्त्रीकरणाचा पाठिंबा, संयुक्त राष्ट्रसंघ व आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे सहकार्य.

**क) अलिप्तता चळवळ (Non-Aligned Movement - NAM)**

अलिप्तता चळवळ ही शीत युद्धाच्या काळात उदयास आलेली आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. या चळवळीचा उद्देश कोणत्याही गटात सामील न होता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबवणे हा होता. शीतयुद्ध काळात अमेरिका किंवा सोव्हिएत यापैकी कोणत्याही गटात न जाता स्वतंत्र धोरण ठेवणे.

**ड) राजनैतिक स्वायत्तता (Strategic** / Diplomatic Autonomy):

राजकिय स्वायत्तता म्हणजे एखाद्या देशाने आपल्या राष्ट्रीय हितानुसार, कोणत्याही बाह्य दबावाशिवाय स्वतंत्रपणे परराष्ट्र धोरण ठरवणे व अंमलात आणणे भारताच्या .परराष्ट्र धोरणातील हे एक अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे. आजही भारत कोणत्याही देशाचा अनुयायी न होता स्वतःच्या हितसंबंधानुसार निर्णय घेतो.

**२. भारताचे प्रमुख परराष्ट्र धोरणाचे उद्देश:**

भारताच्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता जपून आर्थिक विकास साधणे, राष्ट्रीय सुरक्षा सुनिश्चित करणे, जागतिक शांतता आणि स्थिरतेला हातभार लावणे, वसाहतवाद आणि वंशभेदाला विरोध करणे, आणि सर्व देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे ही आहेत, ज्यात पंचशील तत्त्वांचा आधार घेतला जातो.

१. **राष्ट्रीय हितसंबंधांचे रक्षण:** भारताची प्रादेशिक अखंडता, सार्वभौमत्व आणि परदेशातील नागरिकांचे हित जपणे.
२. **आर्थिक विकास:** आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक आणि सहकार्यातून देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे.
३. **शांतता आणि सुरक्षा:** जागतिक शांतता राखणे, आंतरराष्ट्रीय विवादांवर शांततापूर्ण तोडगा काढणे.
४. **पंचशील तत्त्वांचे पालन:** शांततापूर्ण सह-अस्तित्व, परस्पर आदर, दुसऱ्या देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे आणि समानतेच्या तत्त्वांवर आधारित संबंध ठेवणे.
५. **अलिप्ततावाद आणि सामरिक स्वायत्तता:** कोणत्याही मोठ्या गटात सामील न होता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबवणे.
६. **वसाहतवाद आणि वंशभेदाला विरोध:** जगभरातील स्वातंत्र्य चळवळी आणि वंशभेदाविरुद्ध लढणाऱ्यांना पाठिंबा देणे.
७. **आंतरराष्ट्रीय कायद्यांचा आदर:** संयुक्त राष्ट्र संघाच्या आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांच्या तत्त्वांना पाठिंबा देणे.
८. **विकसनशील राष्ट्रांना पाठिंबा:** इतर विकसनशील देशांशी सहकार्य आणि एकता वाढवणे.
९. **समृद्ध वारशाचा प्रचार:** भारताची संस्कृती आणि समृद्ध वारसा आंतरराष्ट्रीय स्तरावर सादर करणे.

❖ **पंडित नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची वाटचाल:**

भारताच्या राजकारणात, समाजकारणात नेहरूंचे अतुलनीय योगदान आहे. आपल्या जीवनातील तब्बल तीस वर्षे पंडित नेहरुंनी भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी ब्रिटिशांशी झगडण्यात घालविले. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात ब्रिटिश सत्तेशी झगडत असताना एकंदरीत या कालखंडात पंडित नेहरुंना जवळपास नऊ वर्षाचा कारावास भोगला. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरूंनी भारताचे नेतृत्त्व सतरा वर्षे केले. या काळात भारताची आधुनिक दृष्टी निर्माण राष्ट्रउभारणीचे त्याचे कार्य अतिशय महत्त्वपूर्ण आणि अतुलनीय असेच आहे. देशातील सर्वसामान्य जनतेत आत्मविश्वास निर्माण करुन तो वाढीस लावण्याचे कार्य नेहरुंच्या नेतृत्त्वाचाच एक भाग होता. भारताची ओळख खऱ्या अर्थाने जगाला करुन देणारे हे एक महान नेते होते.

- **पंडित नेहरुंचे परराष्ट्र धोरणाची वैशिष्टये:**

भारताचे पहिले पंतप्रधान पडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या वाटचालीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले आहे त्यामूळे पंडित जवाहरलाल नेहरू यांची भारताच्या परराष्ट्र धोरणा संदर्भातील भूमिका महत्वाची आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्य परराष्ट्र धोरणाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहेत.

**१.राष्ट्रहितास प्राधान्य:**

भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी शेजारील राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करत असतांना भारताच्या हितसंबंधाकडे दुर्लक्ष केले नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रिय असताना नेहरुंनी देशाचे हितसंबंध जपले.

**२. जागतिक शांतता व सहकार्य:**

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दामुळे जग होरपळून निघाले होते. असे विनाशकारी महायुध्द पुन्हा उदभवू नये यासाठी नेहरूनी आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता व सहकार्याचे महत्व विशद केले. शांततामय सहजीवनाचा त्यांनी पुरस्कार केला.

**३. स्वातंत्र्याचा पुरस्कार व स्वातंत्र्य लढयास सहाय्य:**

कोणतेही राष्ट्र पारतंत्र्यात राहू नये यासाठी त्यांनी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. ज्या राष्ट्रामध्ये पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी चळवळी सुरु आहेत. त्यांना भारताने पाठिंबा व सहकार्य देऊ केले.

**४. आफ्रो आशियायी राष्ट्रांना सहकार्य:**

पाश्चिमात्यांच्या आर्थिक व राजकीय साम्राज्यवादाला बळी पडलेल्या आफ्रिका, आशिया, खंडातील राष्ट्रांनी परस्पर सहकार्याचे धोरण ठेवल्यास त्यांची उन्नती होऊ शकेल. आशिया आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्राशी सहकार्य केले.

**५. वसाहतवादास विरोध:**

आशिया आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे युरोपियनांच्या वसाहतवादातून आपली मुक्तता होण्यासाठी धडपडत होती. त्यांनी वसाहतवादाच्या विरोधात उभ्या केलेल्या संघर्षास नेहरुंनी पाठिंबा देऊ केला.

**६. संयुक्त राष्ट्रसंघाला सहकार्य:**

विनाशकारी महायुध्दे पुन्हा होऊ नयेत, राष्ट्राराष्ट्रातील प्रश्न सामंजस्य सुटावेत यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ निर्माण झाला होता. युनोच्या माध्यमातून निःशस्त्रीक दुर्बल राष्ट्रांना सहकार्य अशा उपक्रमांना भारताने सक्रिय साहाय्य केले. नेहरुंच्या क युनोचा क्रियाशिल सदस्य झाला.

**७. पंचशील:**

आंतराष्ट्रीय सदभावना व सहकार्य वृद्धिगंत व्हावे जागतिक शांतता टिकावे उद्देशाने पंचशील तत्वाचा पुरस्कार करण्यात आला होता. पाश्चात्यांच्या गुलामगिरीतून इंडोनिशियाला मुक्त करण्यासाठी घेण्यात स्वातंत्र्य सैनिकांच्या मेळाव्यात डॉ. सुकार्नो यांनी बौध्द धर्मीय पंचतत्वांच्या पंचशीलचे सर्वांना आव्हान केले. यामध्ये त्यांनी राष्ट्रभक्ती, श्रध्दा, व्यक्तीस्वातंत्र्या केली. पंडित नेहरुंनी पंचशील तत्वांचे पावित्र्य ओळखून त्यास देशाच्या अति धोरणात स्थान देण्याचे ठरविले. २९ एप्रिल १९५४ मध्ये तिबेटच्या स्वायत्ततेसंबंधी चीन यांच्यात झालेया करारामध्ये आधूनिक पंचशील तत्वांचा समावेश करण्यात तत्वे पुढीलप्रमाणे आहेत. १) परस्परांची प्रादेशिक एकात्मता व सार्वभौमत्वाचा आदर करणे. २) परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे. ३) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे. ४) परस्परांना हितावह होईल असा समानतेचा व्यवहार करणे. ५) शांततामय सहजीवन व आर्थिक सहकार्य यांचा अंगीकार करणे.

भारताने अगीकारलेल्या पंचशील धोरणास व्हिएतनाम, म्यानमार, नेपाळ, लाओस,युगोस्लाव्हिया, कंबोडिया या राष्ट्रांनी मान्यता दिली. इंडोनेशियातील बांडुंग येथे नवस्वतंत्र आफ्रिका व आशियायी राष्ट्रांची परिषद १८ एप्रिल १९५५ रोजी संपन्न झाली. या परिषदेत आशिया खंडातील २३ राष्ट्रांनी तर आफ्रिका खंडातील ६ राष्ट्रांनी सहभाग घेतला. या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधावर विचार विनिमय झाला. पंडित जवाहरलाल नेहरूनी पंचशील धोरण स्वीकारण्याचे आवाहन परिषदेतील राष्ट्रांना केले. पाकिस्तान वगळता परिषदेतील सर्व राष्ट्रांनी पंचशील धोरणास मान्यता दिली.

**८. अलिप्ततेचे धोरण:**

पंडित जवाहरलाल नेहरुंच्या परराष्ट्र धोरणातील अलिप्ततेच्या धोरणास अत्यंत महत्वाचे स्थान आहे. या धोरणाच्या माध्यमातून त्यांनी जागतिक राजकारणाला विधायक वळण देऊन भारताला आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वपूर्ण स्थान मिळवून दिले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात लष्करी स्वरुपाच्या व गटातटाच्या राजकारणापासून अलिप्त राहणे म्हणजे अलिप्ततावाद होय. पंडित जवाहरलाल नेहरु दि. ७ सप्टेंबर १९४६ रोजी भारताच्या अलिप्तवादाची धोरणाचे स्पष्टीकरण करताना म्हणतात 'कोणत्याही राष्ट्राचा उपगट म्हणून न राहता, आम्ही एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भाग घेऊ. आम्ही शक्यतो सत्तागटाच्या राजकारणापासून अलिप्त राहू इच्छितो. अमेरिका, रशिया या गटामध्ये सामील न होता जागतिक व्यासपीठावर भारतास सन्मानाचे स्थान मिळविता येईल. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु, इजिप्तचे अध्यक्ष अब्दुल गमाल नासेर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखाली अलिप्त राष्ट्र संघटना निर्माण झाली.

भारतीय परराष्ट्र धोरणाला सैद्धांतिक चौकट पुरवीण्याचा, परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे आणि तत्त्वे स्पष्टपणे निर्धारित करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात झाला आहे. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारतीय परराष्ट्र धोरणात सर्वप्रथम 'सर्वसमावेशक सुरक्षेची' संकल्पना विकसित केली. यात केवळ भारताच्या हितसंबंधाचा, राष्ट्रीय सुरक्षा, सार्वभौमत्वाचे रक्षण यांचाच विचार व्हायला नको, तर भारतातील सामान्य माणसाच्या सुरक्षेचाही विचार झाला पाहिजे. तसेच यात सामान्य व्यक्तीचे प्रतिबिंब पडायला हवे, अशाप्रकारचे त्यांचे धोरण दिसून येते. नेहरूंनी परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीची मांडलेली संकल्पना व्यापक असून यात मानवी सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य दिलेले आहे.

## ➢ भारतीय परराष्ट्र धोरणाचा पंडित नेहरूंनंतरचा कालखंड :

जवाहरलाल नेहरू (1947-1964) यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाची वैचारिक पायाभरणी केली .अलिप्ततावाद, पंचशील, शांततामय सहअस्तित्व आणि नैतिक राजनीती ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती. 1964 नंतर मात्र जागतिक व प्रादेशिक वास्तव बदलले-चीन, पाकिस्तान, शीतयुद्ध, अण्वस्त्रे तसेच आर्थिक दबावामुळे भारताच्या परराष्ट्र धोरणात वास्तववादी व व्यवहार्य बदल झालेहाच कालखंड . भारतीय परराष्ट्र धोरणाचा *नेहरूत्तर कालखंड* म्हणून ओळखला जातो.

**१. लालबहादूर शास्त्री कालखंड: (1964–1966)**

- नेहरूंच्या धोरणात सातत्य, पण अधिक व्यवहार्यता
- संरक्षण व राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य
- अलिप्ततावाद कायम, मात्र आदर्शवाद कमी
- 1965 भारत–पाक युद्ध
- ताश्कंद करार (1966) – सोव्हिएत संघाच्या मध्यस्थीने
- पाकिस्तानविरुद्ध ठाम भूमिका, पण शांततेचा प्रयत्न

हा कालखंड संक्रमणाचा काळ होता—नेहरूंच्या आदर्शवादातून इंदिरा गांधींच्या वास्तववादाकडे वाटचाल.

**२. इंदिरा गांधी कालखंड: (1966–1977 व 1980–1984)**

हा टप्पा नेहरू-उत्तर परराष्ट्र धोरणातील सर्वात महत्त्वाचा व निर्णायक मानला जातो.

**अ) वास्तववादी व शक्ती-केंद्रित धोरण**

- राष्ट्रीय हित सर्वोच्च

- प्रादेशिक वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न

**आ) 1971 भारत–पाक युद्ध**

- बांगलादेश मुक्ती
- दक्षिण आशियातील सामरिक संतुलन बदलले
- भारताची जागतिक प्रतिमा बळकट

**इ) सोव्हिएत संघाशी जवळीक**

- 1971 भारत–सोव्हिएत मैत्री करार
- अलिप्ततावाद असूनही भारत एका महासत्तेकडे झुकले.

**ई) अणु धोरण**

- 1974 पोखरण अणुचाचणी (Smiling Buddha)
- अण्वस्त्र अप्रसार करार (NPT) नाकारला
- स्वायत्त अणु धोरण

**उ) शेजारी देश धोरण**

- पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका यांच्याशी सक्रिय भूमिका
- इंदिरा गांधींनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला आत्मविश्वास, शक्ती आणि स्वायत्तता दिली.

**३. जनता पक्ष कालखंड: (1977–1980)**

- नैतिकता व शांततेवर भर
- शेजारी देशांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न
- चीनशी संबंध सुधारण्याची सुरुवात
- पाकिस्तानशी संवाद
- अलिप्ततावादाचा पुनरुच्चार

**मर्यादा**

- अल्पकालीन सरकार
- ठोस दीर्घकालीन धोरणाचा अभाव

**४. राजीव गांधी कालखंड (1984–1989)**

**अ) नवीन दृष्टिकोन:**

- तंत्रज्ञान, विकास व शांततावाद
- तरुण, आधुनिक भारताची प्रतिमा

**ब) प्रमुख उपक्रम:**

- अण्वस्त्र निःशस्त्रीकरणाचा जागतिक प्रस्ताव
- अमेरिका, सोव्हिएत संघ व चीनशी संतुलन
- श्रीलंकेत IPKF हस्तक्षेप

**मर्यादा:**

- श्रीलंका हस्तक्षेप अपयशी
- अंतर्गत व प्रादेशिक दबाव

**५. शीतयुद्धोत्तर कालखंड: (1991 नंतर)**

हा टप्पा परराष्ट्र धोरणातील मूलभूत परिवर्तनाचा आहे.

**अ) आर्थिक उदारीकरणाचा प्रभाव**

- परराष्ट्र धोरण = आर्थिक हित
- व्यापार, गुंतवणूक, जागतिकीकरण

**आ) बहुध्रुवीय जग**

- अमेरिका, रशिया, युरोप, जपान, ASEAN सर्वांशी संबंध
- धोरणात्मक स्वायत्तता

**इ) नवीन धोरणे**

- पूर्वेकडे पहा नीती Look East Policy
- प्रथम शेजारील राष्ट्रे (Neighborhood First)
- आफ्रिका व पश्चिम आशियावर लक्ष

**ई) अणु धोरण**

- 1998 पोखरण- II अणुचाचण्या
- भारत अण्वस्त्रसज्ज राष्ट्र म्हणून उदय

**नेहरू-कालखंड व नेहरू-उत्तर कालखंड : तुलना (थोडक्यात)**

| नेहरू कालखंड | नेहरूउत्तर कालखंड- |
|---|---|
| आदर्शवादी | वास्तववादी |
| नैतिक राजकरण | राष्ट्रीय हितकेंद्रित |
| अलिप्ततावाद (शुद्ध) | अलिप्ततावाद व्यवहार्यता + |
| सैनिकी शक्तीवर मर्यादित भर | संरक्षण व अणुशक्तीवर भर |

नेहरू-उत्तर कालखंडात भारताने नेहरूंची मूलतत्त्वे टिकवून, बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार वास्तववादी, सुरक्षा-केंद्रित आणि आर्थिकदृष्ट्या प्रेरित परराष्ट्र धोरण स्वीकारले. यामुळे भारत आज जागतिक स्तरावर प्रभावी, स्वायत्त आणि आत्मविश्वासपूर्ण राष्ट्र म्हणून उदयास आला आहे.

**❖ जागतिकीकरणानंतरचे भारतीय परराष्ट्र धोरण :**

सन १९९१ मध्ये भारताने आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण स्वीकारले. यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात मुलभूत परिवर्तन घडून आले. शीतयुद्धाचा अंत, सोव्हिएत संघाचा विघटन आणि एकध्रुवीय जागतिक व्यवस्था या पार्श्वभूमीवर भारताने आदर्शवादाऐवजी व्यवहार्य, आर्थिक आणि बहुआयामी परराष्ट्र धोरण स्वीकारले. जागतिकीकरणानंतरचे भारतीय परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे: १) व्यवहार्य व वास्तववादी, २) आर्थिक विकासाच्या अनुषंगाने प्रयत्न, ३) बहुआयामी दृष्टीकोन, ४) राष्ट्रीय हितकेंद्रित धोरण. जागतिकीकरणानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाने आदर्शवादातून वास्तववादाकडे, राजकीय केंद्रिततेतून आर्थिक केंद्रिततेकडे आणि अलिप्ततावादातून बहुसंलग्नतेकडे (**Multi-alignment**) यशस्वी वाटचाल केली आहे. आज भारत जागतिक व्यवस्थेतील एक जबाबदार, प्रभावी व उदयोन्मुख शक्ती म्हणून ओळखला जातो.

# घटक क्र. २

## भारतीय परराष्ट्र धोरणावरील प्रभाव

**प्रस्तावना:**

राज्यशास्त्र या सामाजिक शास्त्रात व्यक्तीच्या राजकीय वर्तनासोबतच राष्ट्रांच्या वर्तनाचाही अभ्यास केला जातो. राष्ट्राच्या वर्तनाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंध व परराष्ट्र धोरण या दोन स्वतंत्र अभ्यास शाखेतंर्गत केला जातो. राष्ट्रांच्या वर्तनातून परस्परांचे राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचे काम केले जाते. राष्ट्रीय हितसंबंधाची पुर्ती व राष्ट्रीय उिद्दष्टांची साध्यता हा परराष्ट्र धोरणाचा मुख्य आधार आहे. मॉर्गेन्थाच्या मते, प्रत्येक राष्ट्र प्रत्येक धोरण यशस्वी करण्यासाठी साम-दाम-दंड-भेद या सर्व नितीचा अवलंब करून परराष्ट्र धोरण यशस्वी करतात. परराष्ट्र धोरण ही एक व्यवहाराची पध्दती आहे. या पद्धतीचा वापर कला, शास्त्र, तत्वज्ञान अशा अनेक मार्गाने वापर सर्वच राष्ट्र करतात.

- **परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या:**

ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय राहू शकत नाही जर कोणी समाजाशिवाय राहत असेल तरतो देव अथवा दानव असला पाहिजे / असावा. ज्याप्रमाणे मनुष्य एकाकी जीवन जगू शकत नाही तसे राष्ट्रही इतर राष्ट्रासोबत संबंध निर्माण न करता राहू शकत नाही. राष्ट्राच्या विविध प्रकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक राष्ट्रांची मदत घ्यावी लागते. राष्ट्रांच्या या परस्परावलंबी धोरणामुळेच परराष्ट्र धोरण या अभ्यासशाखेचा उदय झाला. परराष्ट्र धोरणाची संकल्पना ऐतिहासिक व प्राचीन आहे. ज्याचा उल्लेख प्लेटोच्या -'द-रिपब्लिक', ॲरिस्टॉटलच्या - 'द पॉलिटिक्स', कौटिल्य - 'अर्थशास्त्र' मॅकेव्हली- 'द प्रिन्स' या ग्रंथात आहे. परराष्ट्र धोरणात स्वतःचे हितसंबंध पुर्ण करण्यासाठी ठरवलेले तत्व, कार्यक्रम, पद्धती तंत्र / मार्ग / साधन / उिद्दष्टये, भुमिका या सर्वांचा समावेश होतो. परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हित साध्यकरण्याचे एक साधन आहे. राष्ट्रीय हित ही परराष्ट्र धोरणाची गुरुकिल्ली आहे. परराष्ट्र धोरण या संकल्पनेच्या खालीलप्रमाने व्याख्या केल्या जातात.

**१) नॉर्मन हिलच्या मते,** एका राष्ट्राने दुसया राष्ट्राच्या संदर्भात दुसया राष्ट्रासंबंधी केलेले प्रयत्न किंवा आखलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**२) प्रा. पिटमन पिटरच्या मते,** परराष्ट्र धोरण म्हणजे आंतरराष्ट्रीयसंबंधात राष्ट्रीय योजना आणि परराष्ट्र सेवा यांच्या कार्यपद्धतीचे व राष्ट्रीय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी केलेले प्रयोजन होय.

**३) चार्लस बर्टनच्या मते,** परराष्ट्र धोरण म्हणजे राजाने आपल्या सीमेबाहेरील क्षेत्रात प्रभाव टाकण्यासाठी केलेली कृती होय.

**४) चार्ल्स लर्श यांच्यामते,** एखादे विशिष्ट उद्‌दिष्टय प्राप्त करण्यासाठी निश्चित केलेमी इतर राष्ट्रासंबंधीची कृतीशील योजना म्हणजे परराष्ट्र धोरण होय."

- **भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक :**

कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचे काम देशांतर्गत व देशाबाहेरील घटक करीत असतात. या सर्व घटकांना 'परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक म्हणतात. परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात राज्यघटना ते सर्वसामान्य जनता

यामधील सर्व घटकांचा समावेश सामान्य केला जातो. भारताच्या प्रराष्ट्र धोरणाला दिशा देण्याचे काम अनेक घटकांनी केले आहे. त्यातील काही घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१) भौगोलिक घटक :**

प्राचीन काळापासूनच परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात भौगोलिक धाटकाचा प्रभाव आहे. प्लेटो राज्य समुद्रापासून दूर रहावे असे म्हणतो, ॲरिस्टॉटलच्या मते राज्य है समुद्रापासून जवळ असावे. भूप्रदेशामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील देशाचे महत्त्व वाढते. उदा., इंग्लंडच्या चारी बाजूने समुद्रकिनास आहे तो युरोपपासून वेगळा जाणवतो, तर इटली युरोप खंडात मध्यवर्ती स्थानात असल्यामुळे त्याला सतत युद्धजन्य परिस्थितीच विचार करावा लागतो. भौगोलिक घटकांतर्गत सष्ट्राचा विस्तृत (आकारमान) भूप्रदेश, भौगोलिक सीमा', भौगोलिक स्थान, हवामान राष्ट्राची उत्पादक क्षमता इत्यादी भौगोलिक घटकाचा प्रभाव परराष्ट्र धोरण निर्धारणावर होत असते.

**२) नैसर्गिक साधनसंपत्ती**ः

कोणत्याही देशाला परराष्ट्र धोरण निर्माण करताना आपल्याकडील नैसर्गिक साधनसंपत्ती अनिजद्रव्र पैसा, कोळसा, , अन्नधान्य अन्नधान्य इत्यादीचा विचार करावा लागतो. ज्या देशाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती मुबलक प्रमाणात आहे, त्या देशाला स्वतःच्या इच्छेप्रमाणे धोरण निर्धारीत करता येते. परराष्ट्र धोरण उदा., आखाती देश मुबलक तेलसाठ्यामुळे OPEC सारख्या संघटनेच्या माध्यमातून जागतिक अर्थव्यवस्थ नियंत्रित करतात.

**३) लोकसंख्या:**

परराष्ट्र धोरणाला निर्धारीत करताना राज्याती लोकसंख्येचा विचार करावा लागतो. चीन आणि भारत विशाल लोकसंख्या असलेले देश आहेत. आपल्या देशातील लोकसंख्येच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पोषक ठरेलले परराष्ट्र धोरण आखावे लागते. आक्रमण, युद्ध यासारखी धोरणे लोकसंख्येच्या आधारावरच ठरवली जातात. लोकांचे नैतिक धैर्य, राष्ट्रवादाची भावना जेवढी प्रबर असेल तेवढे परराष्ट्राशी संघर्ष करण्यास उपयुक्त ठरेल. देशाची लोकसंख्या किती आहे? यापेक्षा ती कशी आहे? या गोष्टीला महत्त्व आहे. लोकसंख्या कार्यक्षम, गुणवत्ताधारक, चारित्र्यः संपन्न, राष्ट्रप्रेमी, कष्टाळू, मानवी मुल्यांवर विश्वास ठेवणारी, त्याग व बलिदानासाठी तत्पर असणारी भसावी तरच परराष्ट्र धोरणाला योग्य दिशा देण्याचे काम नेतृत्त्वाला होता येते. युद्ध, नैसर्गिक संकट व आणिबाणीच्या प्रसंगी लोकांचा पाठिंबा असेल तर सरकार योग्य निर्णय घेऊ शकते.

**४) आर्थिक स्थिती:**

परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात आर्थिक स्थितीचा विचार प्राधान्याने केला जातो. राष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत असल्यास आपल्या इच्छानु रोजगार नैसर्गिक साधन संपत्तीची मुबलकता परकीय परराष्ट्र धोरण ठरविता येते. देशांतर्गत वाढता चलनाचा वाढता साठा, वाढता आर्थिक विकास दर इत्यादी घटक राष्ट्राची आर्थिक स्थिती मजबूत करण्यास कारणीभूत असतात. अमेरिका, रशिया, इंग्लंड, कॅनडा, जपान, फ्रान्स, जर्मनी, चीन,ब्राझील, ईस्स्राइल, आणि भारत अशी काही उदाहः गे सांगता येते ज्यांची आर्थिक स्थिती मजबूत आहे तर काहींची वाटचाल आर्थिक दृष्ट्या मजबूत होण्याकडे आहे. त्यामुळेच वरील देशांनी त्यांच्या इच्छेनुसार परराष्ट्र धोरणाला दिशा दिली आहे.

**५) मित्र राष्ट्रे:**

परराष्ट्र धोरण ठरवताना मित्र राष्ट्र आणि शत्रु राष्ट्रांचा विचार केला जातो. मित्रराष्ट्रांचे हित संबंध अनुकुलता याचा विचार करूनच परराष्ट्र धोरण ठरवता मित्र राष्ट्रांचे हितसंबंध व आपले हितसंबंध सुरक्षित राहतील अशीच भुमिका परराष्ट्र धोरणातून घेतली जाते. रशियाची तटस्थतेची भूमिका यामुळे भारत-रशिया मैत्रीमध्ये तणाव निर्माण झाला नाही. ईराक युद्ध च्यावेळी भारताने अमेरिकेसोबतच्या संबंधात कटुत न येऊ देता ईराक अमेरिका युद्धाला विरोध केला होता.

**६) नेतृत्त्व:**

प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणावर तेथील नेतृत्वाचा प्रभाव पडतो. उदा., स्वातंत्र्यानंतर पंडीत नेहरूचा शांतताप्रिय व सहकार्याचा स्वभाव असल्यामुळे भारताने अलिप्ततावाद, पंचशील, अनाक्रमण, जागतिक सहकार्य व शांततेचे धोरण स्विकारले. नरेंद्र मोदी राष्ट्रवादाच्या विचारसरणीने प्रभावित असल्यामुळे जशास तसे व कुटनितीचे धोरण स्वीकारून सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, नोटाबंदी, सबका साथ सबका विकास, अॅक्ट इस्ट, या धोरणाचा स्वीकार केला. हिटलर व मुसोलिनीचे व्यक्तीमत्व आक्रमक व साम्राज्यवादी असल्यामुळे जर्मनी व इटलीचे धोरण युद्धखोर होते. इंदिरा गांधीच्या वास्तववादी व्यक्तीमत्वामुळे बांग्लादेश युद्ध यशस्वी झाले. सन 1972 चा रशिया सोबत 20 वर्ष संरक्षणाचा करार यशस्वी झाला. सन 1974 ला अणु चाचणी घेण्यात आली. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपण आपला प्रभाव वाढवण्यासाठी प्रत्येक राष्ट्राला कुशल नेतृत्वाची आवश्यकता असते. ज्या ज्या देशांना कुशल नेतृत्व मिळाले, त्या सर्वांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिष्ठा व वर्चस्व वाढले आहे.

**७) लष्करी शक्ती :**

परराष्ट्र धोरण ठरवताना स्वतः कडील व इतर राष्ट्रांकडील लष्करी शक्तीचा विचार करावा लागतो. आपल्या देशाकडे सैनिकी साहित्य युद्ध कौशल्य, अण्वस्त्र, क्षेपणास्त्रे, रणगाडे, लष्कर या सर्वांची दखल घ्यावी लागते. अमेरिका, रशिया, चीन, उत्तर कोरीया यांच्यासारखी राष्ट्रे लष्करी शक्तीच्या सामर्थ्यावरच युद्धविषयक धोरणांचा अवलंब करतात. सन 1962 ला भारत लष्करी शक्तीत कमकुवत होता. म्हणूनच चीन सोबतच्या युद्धात तडजोडीचा मार्ग स्वीकारावा लागला, परंतू हिच स्थिती 2018 च्या भारत-चीन संबंधातील डोकलाम मुद्दयाबाबत दिसून येत नाही.

**8) राजनयाची कुशलता :**

परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करण्याचे काम राजनय प्रक्रिया महत्वपूर्ण ठरते. त्यामुळे कुशल अनुभवी व तज्ञ राजनयाची निवड परराष्ट्र धोरणात केली जाते. कुराल राजनयामुळेच राष्ट्राराष्ट्रात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतातः राजनयाची भुमिका राजदूतासोबतचपरराष्ट्र मंत्री, पंतप्रधान, परराष्ट्र सचिव विविध प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय संघटनातील राष्ट्रांचे प्रतिनिह बजावतात अलीकडे आर्थिक राजनयाचे महत्त्व वाढत आहे. उदा., हेन्री किन्सीजर या अमेरिकान राजदूत 1970 च्या दशकात भारत व रशियाच्या विरोधात अमेरिका, पाकिस्तान व चीन यांच्यात मैत्री घडवून आणली होती. सन 2019 च्या मंत्रीमंडळाचा विस्तार करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कुशल राजनय असणाऱ्या व परराष्ट्र सचिव म्हणून कार्य करणा एस. जयशंकर यांना भारताचे परराष्ट्र मंत्री बनवले. यावरून परराष्ट्र धोरण ठरवताना राजनर ची कुशलता किती आवश्यक आहे हे लक्षात येते.

**९) आंतरराष्ट्रीय संघटना :**

परराष्ट्र धोरण ठरवताना देशांतर्गत व देशाबाहेरील घटकांचा प्रभाव जाणवतो देशाबाहेरील घटकांतर्गत मित्र राष्ट्र शेजारील देश या सोबतच आंतरराष्ट्रीय संघटनाही महत्त्वाची असते. आंतरराष्ट्रीय धोरण ठरवावे लागते. प्रराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना आंतरराष्ट्रीय कायदा युनोची राज्यघटना आंतरराष्ट्रीय संकेत प्रया व परंपरांचा आदर व सन्मान करावा लागतो. अन्यथा आंतरराष्ट्रीय लोकमत आपल्या विरोधी बनते. उदा., भारताने स्वातंत्र्यापासूनच आंतरराष्ट्रीय संघटनांशी अनुकुल व पोषक ठरेल असेच धोरण आजपर्यंत बनवले आहे.

**१०) लोकमत :**

परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्थरावरील लोकमत जाणून घ्यावे लागतेः लोकमताचा अनादर करणाऱ्या देशाला आपले परराष्ट्र धोरण योग्यरित्या ठरवता येत नाही लोकमताच्या आधारावरच शासन व्यवस्था टिकून असते. परराष्ट्र धोरणाचा संबंध राष्ट्राचे सार्वभौमत्व व देशांतर्गत असणाऱ्या जनतेच्या कल्याणाशी संबंधीत आहे.

**११) कायदेमंडळाचे सहकार्य :**

परराष्ट्र धोरण निर्धारण करताना जगातील सर्वच देशाला कायदेमंडळाचे सहकार्य आवश्यक असते. आधुनिक लोकशाही शासन व्यवस्थेत अंतिम सत्ता कायदेमंडळाच्या हातात असते. त्यामुळे परराष्ट्र धोरण ठरवताना कायदेमंडळाची अनुकुलता व प्रतिकुलता विचारात घ्यावी लागते. उदा., अमेरिकेसोबत अणुऊर्जा करार करताना मनमोहन सिंहचा सरकारचा पाठींबा मार्क्सवादी पक्षाने काढल्यामुळे मनमोहन सिंहाचे सरकार अल्प मतात आले होते.

वरील प्रमाणे भारताच्या प्रराष्ट्र धोरणाला निर्धारीत करण्याचे काम अनेक घटक करतात. उदा., औद्योगिकरण, कृषी व्यवस्था, राजकीय विचारसरणी, राष्ट्राचे चारित्र्य व मनोधैर्य शासन व्यवस्था इत्यादी.

**❖ भारतीय परराष्ट्र धोरणातील राजकीय पक्षाची भूमिका:**

परराष्ट्र धोरणाचे निर्धारण ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया असते. देशाच्या परराष्ट्र धोरणावर अनेक घटकांचा प्रभाव पडलेला असतो. परराष्ट्र धोरणाचे निर्धारण **राजकीय पक्ष, दबाव गट, प्रसारमाध्यमे व लोकमत** या घटकांचादेखील महत्त्वाचा वाटा असतो. त्यांना परराष्ट्र धोरणाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार नसतात किंवा त्यासंबंधीच्या निर्णयप्रक्रियेत त्यांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो हे खरे! पण सरकारच्या निर्णयावर त्यांचा प्रभाव निश्चितच पडत असतो. या घटकांमध्ये **राजकीय पक्ष** परराष्ट्र धोरणाच्या निर्धारण प्रक्रियेत कसा सहभाग असतो याची माहिती आता आपणास पाहावयाची आहे.

**अ) राजकीय पक्ष व लोकशाही व्यवस्था:**

परराष्ट्र धोरणाच्या निर्मितीत सहभागी होत असलेल्या विविध घटकांपैकी राजकीय पक्ष हा एक महत्त्वाचा घटक होय. लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केलेल्या देशांच्या परराष्ट्र धोरणावर तर राजकीय पक्षांचा फार मोठा प्रभाव पडलेला असतो. याचे कारण असे की, राजकीय पक्ष हे लोकशाही व्यवस्थेचे आवश्यक भाग असतात. राजकीय पक्षांच्या अस्तित्वाशिवाय लोकशाही शासनपद्धती राबविली जाऊ शकत नाही लोकशाही व्यवस्थेतील शासनयंत्रणा कार्यान्वित करण्याची जबाबदारी राजकीय पक्ष पार पाडतात; म्हणून **बेजहॉट** यांनी असे म्हटले आहे की, 'पक्षीय शासन हे प्रातिनिधिय शासनाचे आवश्यक तत्त्व आहे.' राजकीय पक्षांची अनिवार्यता लोकशाही व्यवस्थेतील राजकीय पक्षांचे स्थान व महत्त्व विचारात घेता शासनाच्या धोरणावर त्यांचा प्रभाव पडणे स्वाभाविक असते. लोकशाही व्यवस्थेत सुसंघटित शासनाची स्थापना राजकीय पक्षांच्या अस्तित्वामुळे शक्य होते.

**ब) अनेक राजकीय पक्षांचा सहभाग:**

लोकशाही व्यवस्थेत अनेक राजकीय पक्ष सहभागी होत असतात. व्यक्तिस्वातंत्र हे लोकशाही व्यवस्थेचे आधारभूत तत्त्व आहे. या व्यवस्थेत विचारस्वातंत्र्य, मतप्रदर्शन स्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य यांना मान्यता देण्यात आलेली असते; त्यामुळे समान राजकीय विचारप्रणाली किंवा समान राजकीय कार्यक्रम मान्य असलेले लोक एकत्र येऊन आपला राजकीय पक्ष स्थापन करतात. समाजात निरनिराळ्या राजकीय विचारप्रणालींवर किंवा राजकीय कार्यक्रमांवर विश्वास ठेवणारे नागरिक असल्यामुळे येथे अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात येतात; म्हणून लोकशाही शासनपद्धती ही अनेकपक्षपद्धती किंवा बहुपक्षपद्धती प्रचलित असलेली व्यवस्था असते.

**क) परराष्ट्र धोरण आणि राजकीय पक्षपद्धती:**

देशाच्या राजकीय व्यवस्थेत सहभागी झालेल्या निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या विचारप्रणाली, ध्येय धोरणे व राजकीय कार्यक्रम यांत बरीच भिन्नता असते. काही वेळा त्यांच्या विचारप्रणाली व कार्यक्रम यांत परस्परविरोधही असतो. निवडणुकीमध्ये ज्या राजकीय पक्षाचा विजय होतो, त्याच्या हाती देशाची सत्तासुत्रे येतात. सत्तारुढ पक्ष आपली विचारप्रणाली, ध्येय धोरणे व कार्यक्रम यांना अनुसरून शासनाची धोरणे ठरवितो आणि ती राबविण्याचा प्रयत्न करतो. देशाच्या परराष्ट्र धोरणावरही सत्ताधारी राजकीय पक्षाच्या विचारांचा व कार्यक्रमाचा प्रभाव पडलेला असतो. तथापि देशातील विरोधी पक्षांना सरकारचे परराष्ट्र धोरण पूर्णपणे मान्य असतेच असे नाही. परराष्ट्र धोरणातील काही भागाला त्यांचा विरोध असतो आणि सरकारने परराष्ट्र धोरणाच्या त्या भागात बदल करावा अशी मागणी विरोधी पक्ष करू लागतात. देशातील विरोधी पक्षांनाही जनतेचा काही प्रमाणात पाठिंबा असतोच; त्यामुळे बऱ्याच वेळा सरकारलादेखील विरोधी पक्षांच्या मागणीची दखल घेणे भाग पडते.

**ड) भारतातील राजकीय पक्षपद्धती व परराष्ट्र धोरण:**

आंतरराष्ट्रीय पटलावर भारताचा एक सार्वभौम राष्ट्र म्हणून उदय झाल्यावरच देशाच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करण्याचा प्रश्न उपस्थित झाला; म्हणून आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा विचार साधारणतः इ. स. १९४७ नंतरच्या कालखंडाच्या सिंदर्भातच करतो. तथापि स्वातंत्र्यपूर्व काळातही भारतातील राजकीय पक्षांनी परराष्ट्र धोरणाच्या किंवा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतीत काही ठोस भूमिका घेतली असल्याचे पाहावयास मिळते. स्वातंत्र्यपूर्व काळात देशातील राजकीय पक्षांची संख्या खूपच मर्यादित होती. त्यांपैकी काही राजकीय पक्ष तर काँग्रेसअंतर्गत संघटना किंवा काँग्रेसचे घटकपक्ष म्हणूनच कार्य करीत होते परंतु या पक्षांपैकी भारतीय कम्युनिस्टपक्ष, काँग्रेस समाजवादी पक्ष अशा काही पक्षांनी आंतरराष्ट्रीय राजकारणासंबंधीचा आपली भूमिका अतिशय स्पष्ट शब्दांत पुढे मांडली होती.

**इ) काँग्रेसची स्वातंत्र्यपूर्व काळातील भूमिका:**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळातही एका विशिष्ट तात्त्विक भूमिकेतून आतरराष्ट्रीय राजकारणावर आपले विचार व्यक्त केले होते. अर्थात काहीजणांच्या मते स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे स्वरूप एक राजकीय पक्ष असे नव्हते. काँग्रेस संघटना ही राष्ट्रीय स्वातंत्र्याची व्यापक अशी चळवळ होती. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्नशील असलेली एक सर्वसमावेशक चळवळ किंवा संघटना असे त्या काळातील काँग्रेसचे स्वरूप होते; म्हणूनच अनेक लहान-मोठे राजकीय पक्ष किंवा संघटना त्या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विशाल छत्राखाली एकत्र आल्या होत्या आणि त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान केले होते.

**फ) वसाहतवाद व साम्राज्यवाद यांना विरोध :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने एक संघटना या नात्याने का असेना, पण आंतरराष्ट्रीव राजकारण व परराष्ट्र धोरण यासंबंधी निश्चित भूमिका घेतली होती हे मान्य करावे लागते. विशेषतः वसाहतवाद व साम्राज्यवाद यांना असलेला विरोध काँग्रेसने स्पष्ट शब्दांत नोंदविला होता. काँग्रेसचा साम्राज्यवादविरोध संकुचित स्वरूपाचा मुळीच नव्हता. म्हणजे असे की, काँग्रेसने केवळ भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात साम्राज्यवादाला विरोध केला नव्हता. तिच्या या भूमिकेला तात्त्विक आधार होता. जागतिक साम्राज्यवादी व वसाहतवादी सत्तांनी जगाच्या निरनिराळ्या भागांतील जनतेचे अपरिमित शोषण चालविले आहे; म्हणून जगातून साम्राज्यवाद व वसाहतवाद यांचे पूर्णपणे उच्चाटन झाले पाहिजे; साम्राज्यवादाचा अंत झाल्यानेच जगातून शोषणाचा अंत होऊ शकेल असे काँग्रेसचे त्यासंबंधीचे प्रतिपादन होते. याच तात्विक भूमिकेतून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी आशिया व आफ्रिका खंडांतील इतर देशांत चालू असलेल्या स्वातंत्र्य चळवळींना पाठिंबा दिला होता.

**ग) वर्णभेद व हुकूमशाही यांना विरोध :**

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने वर्णभेद व वंशभेद यांना विरोध करण्याची भूमिका घेतली होती. वर्ण, वंश इत्यादी गोष्टींच्या आधारे मानवामानवांत भेद करणे हे मानवतेला लांच्छनास्पद आहे; सर्व मानव समान असल्याने जगात बंधुभाव वाढीस लावण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे; म्हणून वर्ण किंवा वंश यांच्या आधारे मानवामानवांत भेदभाव निर्माण करू पाहणाऱ्या शक्तींना जोरदार विरोध केला पाहिजे असे काँग्रेस नेत्यांनी म्हटले होते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणातील हकूमशाही शक्ती व प्रवृत्ती यांनाही काँग्रेसने ठाम विरोध दर्शविला होता. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ चालू असल्याच्या काळातही इंग्रजांना विरोध करण्यासाठी हकूमशाही शक्तींना पाठिंबा देण्याची चूक काँग्रेसने केली नव्हती. उलट स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसने नाझीझम व फॅसिझम यांना तीव्र विरोध केला होता. या दोन विचारप्रणालींच्या रूपाने जगावर नवे संकट येऊ घातले आहे अशी काँग्रेसची त्या संदर्भात प्रतिक्रिया होती. याच भूमिकेतून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी स्पेनमधील फ्रॅन्कोच्या हुकूमशाही राजवटीला विरोध करून त्या राजवटी-विरुद्ध लढा देत असलेल्या प्रजासत्ताकवादी शक्तींना पाठिंबा दर्शविला होता. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने स्वातंत्र्यपूर्व काळात आंतरराष्ट्रीय राजकारणासंबंधी घेतलेल्या वरील भूमिकेला भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. काँग्रेसच्या या भूमिकेचा किंवा या विचारप्रणालीचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर मोठाच प्रभाव पडला आहे.

**ह) काँग्रेसच्या विचारप्रणालीचा प्रभाव:**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर काँग्रेस संघटनेचे रूपांतर एका राजकीय पक्षात झाले. देशाची सत्तासूत्रे काँग्रेस पक्षाच्याच हाती आली. स्वातंत्र्यानंतरची सुरुवातीची काही वर्षे देशाची राजकीय सत्ता ही एकट्या काँग्रेस पक्षाची मक्तेदारी बनून राहिली होती. देशातील सर्वसामान्य जनतेच्या मनावर राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी झालेल्या देदीप्यमान चळवळीचा जबरदस्त प्रभाव होता; तसेच पंडित जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या लोकप्रिय नेत्याचे नेतृत्व काँग्रेसला लाभले होते. अशा परिस्थितीत देशातील जनता काँग्रेस पक्षाच्या पाठीशी उभी राहिली. त्यातून काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी निर्माण झाली.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा देशाचा सत्ताधारी पक्ष बनला. काँग्रेस पक्षाच्या तुलनेत विरोधी पक्ष अगदीच दुर्बल राहिले; त्यामुळे देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात काँग्रेस पक्षाने आणि त्यातही त्या पक्षाचे नेते पंडित जवाहरलाल नेहरू यांनीच महत्त्वाची भूमिका बजावली.

काँग्रेस पक्षात त्यांना अन्य कोणी प्रतिस्पर्धी नव्हता; म्हणजे पक्षीय पातळीवर त्यांचे नेतृत्व एकमुखी होते. इतकेच काय पण विरोधी पक्षांतील अनेक नेत्यांनाही नेहरूंविषयी आदर वाटत होता. देशातील सर्वसामान्य जनतेत त्यांना प्रचंड लोकप्रियता लाभली होती; त्यामुळे शासनाची धोरणे ठरविण्याच्या बाबतीत त्यांच्या मतांना प्राधान्य लाभले होते.परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत तर नेहरूंचा वैचारिक प्रभाव अगदी स्पष्टपणे जाणवत नेहरूजा आतरराष्ट्रीय राजकारणात विशेष रस होता. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि जागतिक इतिहास यांचे सखोल अध्ययन त्यांनी केले होते. सध्याच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कोणती भूमिका स्वीकारणे आपल्या देशाच्या हितसंबंधांच्या रक्षणाच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल याचा अचूक वेध त्यांनी घेतला होता. पंडित नेहरू हे देशाने पंतप्रधान तर होतेच, पण परराष्ट्र व्यवहार खातेही त्यांनी स्वतःकडेच ठेवले होते, तेव्हा भारताचे पंतप्रधान व परराष्ट्र मंत्री अशा दोन्ही नात्यांनी त्यांनी देशाच्या परराष्ट्र धोरणाची आखणी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. या बाबतीत त्यांना काँग्रेस पक्षातूनच काय पण विरोधी पक्षांकडूनही फारसा विरोध झाला नाही.

**ई) नेहरूंनंतरच्या काळातील काँग्रेस पक्षाचे परराष्ट्र धोरण:**

पंडित नेहरू यांच्यानंतरही देशाची सत्तासूत्रे बरीच वर्षे काँग्रेस पक्षाच्याच हाती राहिली; परंतु नेहरूंनंतर अधिकारावर आलेल्या काँग्रेस पक्षाच्या पंतप्रधानांनी नेहरूंचेच धोरण पुढे चालविले, देशाच्या परराष्ट्र धोरणात त्यांनी फार मोठे फेरफार केले नाहीत. पाठीमागच्या प्रकरणात आपण भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेतला आहे. त्यात लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी, राजीव गांधी, पी.व्ही. नरसिंहराव यांनी नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणाचाच कसा पाठपुरावा केला याची माहिती आपण पाहिली आहे. याबाबतीत सध्याचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनीच थोडीशी वेगळी भूमिका घेतली आहे, असे म्हणता येईल.

**ज) धोरण-निर्धारणातील काँग्रेसेतर पक्षांची भूमिका:**

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या परराष्ट्र धोरणाला त्या वेळच्या विरोधी पक्षांनी मुळीच विरोध दर्शविला नव्हता असे सरसकट विधान करणे चुकीचे ठरेल. जनसंघ, रामराज्य परिषद व पुढील काळात स्वतंत्र पक्ष यांनी काही बाबतींत वेगळी भूमिका घेतली होती. जनसंघ, रामराज्य परिषद यांसारख्या काही पक्षांना नेहरूंचे पाकिस्तानविषयक धोरण मान्य नव्हते. पाकिस्तानला भारताने सर्वशक्तीनिशी विरोध केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. विशेषतः काश्मीरच्या प्रश्नावर या पक्षांनी नेहरूंच्या धोरणावर जोरदार टीका केली होती. तसेच स्वतंत्र पक्ष व काही प्रमाणात जनसंघ यांचा नेहरूंच्या अलिप्ततावादी धोरणालाही विरोध होता. स्वतंत्र पक्षाच्या काही नेत्यांनी तर नेहरूंचा अलिप्ततावाद बेगडी स्वरूपाचा आहे असे म्हटले होते. भारताने अमेरिकेशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करणे आपल्या हिताचे ठरेल असे त्यांचे म्हणणे होते.

भारतीय कम्युनिस्ट पक्षासारख्या काही पक्षांनी मात्र नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाला पूर्ण पाठिंबा दिला होता. या पक्षांचा काँग्रेसच्या अंतर्गत धोरणाला विरोध होता. परंतु त्याच्या परराष्ट्र धोरणाशी त्यांनी सहमती दर्शविली होती. इंदिरा गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात काँग्रेस पक्षामध्ये उभी फूट पडली. त्या पक्षाच्या जुन्या व वरिष्ठ नेत्यांनी संघटना काँग्रेस या नावाने आपला वेगळा पक्ष स्थापन केला. या पक्षाचाही अलिप्ततावादी धोरणाला विरोध होता. संघटना काँग्रेसचे अनेक नेते अमेरिकेच्या बाजूला झुकलेले होते. त्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका व सोव्हिएत युनियन यांच्यातील स्पर्धा शिगेला पोहोचली असल्याने जगावर शीतयुद्धाची दाट छाया पसरली होती. या स्थितीत भारताने अमेरिकेच्या भूमिकेला पाठिंबा द्यावा असे संघटना काँग्रेसच्या नेत्यांचे म्हणणे होते. समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष या समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या पक्षांनी मात्र परराष्ट्र धोरणाबाबत काहीशी संदिग्ध भूमिका

घेतली होती. या पक्षांच्या काही नेत्यांना अलिप्ततावादाचे धोरण तत्त्वतः मान्य होते; पण त्या तत्त्वाची सरकारकडून योग्य प्रकारे अंमलबजावणी केली जात नाही अशी त्यांची तक्रार होती. समाजवादी पक्षांतील काही नेत्यांचा अलिप्ततावादी धोरणालाच विरोध होता; परंतु हा विरोध स्पष्ट स्वरूपात नोंदविणे मात्र त्यांना शक्य झाले नव्हते.

**ख) परराष्ट्र धोरणासंबंधी अभ्यासपूर्ण मतप्रदर्शन :**

वरील विवेचनाच्या आधारे देशातील राजकीय पक्षांनी सरकारच्या परराष्ट्र धोरणासंबंधी सर्वसाधारण सहमती दर्शविली होती असा निष्कर्ष आपणास काढता येईल. सरकारने स्वीकारलेले अलिप्ततावादी धोरण बहुतेक राजकीय पक्षांनी तत्त्वतः मान्य केले होते; परंतु परराष्ट्र धोरणाच्या अंमल-बजावणीबाबत विरोधी पक्षांनी सरकारवर अनेक वेळा टीकाही केली होती. आपले सरकार राष्ट्रीय हितसंबंधांच्या रक्षणाबाबत पुरेसे दक्ष नाही असा विरोधी पक्षांच्या नेत्यांचा मुख्य आक्षेप होता. देशाच्या परराष्ट्र धोरणाबाबत संसदेच्या दोन्ही सभागृहांत अत्यंत उपयुक्त चर्चा त्या काळात होत असत. साधारणतः इ. स. १९७० पर्यंत भारतीय संसदेत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष अशा दोन्ही बाजूंकडे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सखोल अभ्यास असणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, बॅ. नाथ पै. प्रा. हिरेन मुखर्जी, ज्योतिर्मय वाजपेयी, भूपेश गुप्ता, श्रीपाद अमृत डांगे, डॉ. राममनोहर लोहिया, मधू लिमये, मधू दंडवते, अटलबिहारी वाजपेयी यांसारखे अनेक नेते होते; त्यामुळे सभागृहांतील परराष्ट्र धोरणविषयक विशेष रंगत चढत असे. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी उपस्थित केलेल्या महत्वाच्या मुद्द्यांची दखल घेणे सरकारलादेखील भाग पडत असे.

**ल) विधायक तसेच एकांगी विरोध:**

सरकारच्या परराष्ट्र धोरणासंबंधी देशात सर्वसाधारण एकमत झाले असल्याचे आढळून येत असले, तरी काही मुट्यावर पक्षाकडन आक्षेप घेतले जाणे स्वाभाविक होते. संसदीय राजकारणात सरकारची पक्षाचे कार्य समजले जाते. देशातील जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी असा व कार्यपद्धती यांना विरोध करणे. तसेच त्यातील दोष व उणिवा दाखवून देणे हे विरोधी प्रकारची क्रियाशीलता दाखविणे ही संसदीय राजकारणातील विरोधी पक्षांची एक असते त्यामुळे येथील विरोधी पक्षांनी परराष्ट्र धोरणाशी निगडित काही दोन वेगवेगळे पैलू पाहावयास मिळतात. देशातील काही विरोधी पक्षांनी सरकारला वेळोवेळी धारेवर धरले होते; परंतु विरोधी पक्षांकडून केल्या गेलेल्या विरोधाचे धोरणाबाबत एक निश्चित स्वरूपाची भूमिका घेतली होती. त्यांच्या भूमिकेला प्रमाणात तात्त्विक अधिष्ठान होते; त्यामुळे सरकारच्या परराष्ट्र धोरणावर टीका करतानादेखील त्यांनी विधायक दृष्टी ठेवली होती. केवळ विरोधासाठी विरोध अशी त्यांची भूमिका नव्हती. देशातील इतर काही विरोधी पक्षांनी मात्र केवळ सरकारला अडचणीत आणण्याच्या उद्देशाने परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नांना आपल्या टीकेचे लक्ष्य होते; त्यामुळे त्यांची टीका बऱ्याच वेळा एकांगी स्वरूपाची वाटत असे. सरकारला धारेवर धरण्याची संधी अशा संकुचित दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नाकडे काही राजकीय पक्ष पाहत असत; त्यामुळे परराष्ट्र धोरणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या व राष्ट्राच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या गोष्टीलाही राजकीय रंग प्राप्त होत असे.

**म) विरोधी पक्षांचे सरकारशी सहकार्य:**

भारतातील विरोधी पक्षांनी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर वेळप्रसंगी टीका केली असली तरी राष्ट्रापुढील आणीबाणीच्या प्रसंगी त्यांनी सरकारशी सहकार्य करण्याची भूमिकाही घेतली होती. इ. स. १९६२ मधील चिनी आक्रमण, इ. स. १९६५ मध्ये भारत व पाकिस्तान यांच्यात झालेले युद्ध, इ. स. १९७१ मध्ये बांगलादेश निर्मितीच्या वेळी पाकिस्तानशी

झालेले युद्ध अशा प्रसंगी देशातील सर्वच राजकीय पक्षांनी भारत सरकारच्या धोरणाला निःसंदिग्ध पाठिंबा दिला होता. इतकेच नव्हे तर सरकारच्या त्यासंबंधीच्या धोरणाचे समर्थन करण्यासही विरोधीपक्ष पढे आले होते.

**न) परराष्ट्र धोरणात सत्ता बदलानंतरही सातत्य:**

सन १९७७ च्या लोकसभा निवडणुकीने देशाच्या राजकारणात फार मोठे परिवर्तन घडवून आणले. काँग्रेस पक्षाची सत्तेतील मक्तेदारी या निवडणुकीने संपुष्टात आणली. नव्यानेच स्थापन झालेल्या जनता पक्षाला केंद्रात सरकार स्थापन करण्याची संधी मिळाली; परंतु राजकीय सत्तेच्या या खांदेपालटानंतरही देशाच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य कायम राहिले. जनता पक्षाच्या सरकारने पूर्वीपासून चालत आलेल्या परराष्ट्र रोधी धोरणात कोणतेही महत्त्वाचे बदल केले नाहीत. त्याने देशाचे अलिप्ततावादी धोरणच पुढे चालू ठेवले. या निमित्ताने राजकीय पक्षांनी परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत आपल्या राजकीय परिपक्वतेचे दर्शन घडविले असे म्हणता येईल. परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना राष्ट्रीय हितसंबंधांचाच प्रामुख्याने विचार केला पाहिजे याचे भान जनता पक्षाच्या नेत्यांनी ठेवले होते; त्यामुळे देशांतर्गत राजकारणात काँग्रेस पक्षाला विरोध करताना परराष्ट्र धोरणाबाबत काँग्रेस पक्षाने घालून दिलेली नीती पुढे चालू ठेवण्यात त्यांना कसलीही अडचण वाटली नाही.

**ओ) संकुचित पक्षीय राजकारणापासून दूर:**

पुढील काळात भारतीय राजकारणात बरेच मोठे फेरबदल झाले. परिणामी केंद्रातील सरकारे वरचेवर बदलत गेली. तथापि केंद्रात कोणत्याही पक्षाचे किंवा आघाडीचे सरकार सत्तेवर आले तरी त्याने परराष्ट्र धोरणातील सातत्य कायम राखण्यासच पसंती दिली; म्हणूनच भारताच्या परराष्ट्र धोरणाला केंद्र सरकारमधील बदलानंतरही एकदम वेगळी दिशा मिळाली असे कधी घडले नाही. प्रत्येक सरकारने राष्ट्रीय हिताला प्राधान्य देऊन परराष्ट्र धोरणविषयक निर्णय घेतले. याचे श्रेय देशातील सर्वच राजकीय पक्षांकडे जाते. राजकीय पक्षांनी, काही अपवाद वगळता, परराष्ट्र धोरणाबाबत संकुचित पक्षीय राजकारण केले नाही. परराष्ट्र धोरणाच्या जडणघडणीत देशातील राजकीय पक्षांचा असाही हातभार लागला आहे.

**❖ भारतीय परराष्ट्र धोरणातील दबाव गटांची भूमिका:**

**दबाव गट म्हणजे काय ?**

लोकशाही व्यवस्थेत दबावगटांच्या भूमिकेलाही राजकारणात महत्त्व प्राप्त झालेले असते. लोकशाही प्रक्रियेचा एक आवश्यक भाग म्हणून दबाव गटांकडे पाहिले जाते. दबाव गट म्हणजे समान हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी स्थापन केलेली संघटना होय. आधुनिक समाज हा संमिश्र व गुंतागुंतीची व्यवस्था असलेला समाज आहे. समाजात वेगवेगळ्या प्रकारचे हितसंबंध असलेल्या व्यक्ती एकत्र वास्तव्य करीत असतात. त्यातून समान हितसंबंध असलेल्या व्यक्त आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या उद्देशाने एकत्र येतात. अशा प्रकारे समाजात समान हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे अनेक गट अस्तित्वात येतात. समाजातील अशा गटांना हितसंबंधी गट किंवा दबाव गट असे म्हटले जाते.

**अ) धोरणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न:**

दबाव गटाचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगितले जाते की. ते शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडण्यासाठी प्रयत्नशील राहतात. आपल्या सभासदांच्या हितसंबंधांचे रक्षण करणे हा त्यांचा मुख्य उद्देश असतो; परंतु समाजातील कोणत्याही वर्गाच्या किंवा गटाच्या हितसंबंधांचे रक्षण बऱ्याच प्रमाणात सरकारच्या धोरणावर अवलंबून असते. आधुनिक

काळात शासनसंस्थेच्या कार्यक्षेत्रात झालेल्या अमर्याद वाढीमुळे समाजातील प्रत्येक वर्गाचे किंवा गटाचे हितसंबंध शासकीय धोरणाशी निगडित झाले आहेत. साहजिकच आपल्या हितसंबंधांचे चांगल्या प्रकारे रक्षण होण्यासाठी सरकारच्या धोरणावर प्रभाव पाडण्याची आणि आवश्यक तर सरकारका दबाव आणण्याची गरज समाजातील विविध हितसंबंधी गटांना भासते; त्यामुळे ते शासनाच्या धोरणावर प्रभाव पाडण्याचा किंवा सरकारने आपणास अनुकूल धोरण स्वीकारावे म्हणून सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करू लागतात. हितसंबंधी गटांच्या या कार्यपद्धतीमुळे त्यांना दबाव गट असे संबोधले जाते.

**आ) पाश्चात्त्य देशांतील दबाव गट:**

पाश्चात्त्य देशांच्या राजकीय जीवनात दबाव गटांच्या भूमिकेला अतिशय महत्त्व प्राप्त झाले असल्याचे दिसून येते. याचे एक कारण असे सांगता येईल की, पाश्चात्त्य देशांतील नागरिकांत असलेल्या राजकीय जागृतीमुळे तेथील दबाव गटांनादेखील अतिशय सुसंघटित स्वरूप प्राप्त झालेले असते. साहजिकच तेथील सरकारांनादेखील दबाव गटांच्या भूमिकेची दखल घेणे भाग पडते. काही पाश्चात्त्य देशांतील दबाव गट राजकीयदृष्ट्या इतके प्रभावी आहेत की, तेथील सरकारांना धोरणविषयक प्रश्नांसंबंधी निर्णय घेताना दबाव गटांनाही विश्वासात घ्यावे लागते. काही वेळा सरकारच्या परराष्ट्र धोरणावरही दबाव गटांचा प्रभाव पडतो. उदाहरणार्थ-अमेरिकेच्या राजकारणात ज्यू लॉबी इतकी प्रभावी आहे की, तेथे अधिकारावर येणाऱ्या प्रत्येक अध्यक्षाला त्या लॉबीच्या म्हणण्याची दखल घ्यावीच लागते. अमेरिकेच्य इस्रायलशी असलेल्या घनिष्ठ संबंधांचे हे एक महत्त्वाचे कारण होय.

**इ) भारतातील दबाव गटांचे स्वरूप :**

आपल्या देशातील दबाव गट पाश्चात्र देशांतील दबाव गटांइतके सुसंघटित नाहीत; परंतु येथे लोकशाही शासनपद्धती जसजा रुजत गेली तसतसे देशाच्या राजकारणात दबाव गटांनाही महत्त्व प्राप्त होत गेले तसेच त्यांच्या संख्येतही वाढ होत गेली. सद्य:स्थितीत भारतीय राजकारणातदेखील निरनिराळ्याप्रकारचे दबाव गट महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे आढळून येते. आपल्या देशातील सरकारलादेखील त्यांच्या मागण्यांची वेळोवेळी दखल घ्यावी लागते म्हणून भारतीय राजकारणाचे अध्ययन करताना आपणास दबाव गटाचे अस्तित्व व त्यांच्या भूमिका यांकडे दुर्लक्ष करता येत नाही.

**ई) परराष्ट्र धोरण व दबाव गट:**

भारतीय राजकारणात दबाव गटांना महत्त्व येऊ लागले असले तरी त्यांच्या बाबतीत एक गोष्ट प्रकषनि जाणवते. ती म्हणजे, येथील बहतेक प्रभावशाली दवाव गट प्रामुख्याने आपल्या आर्थिक मागण्या मान्य करवून घेण्यासाठी आग्रही असतात. त्यांनी आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणावर जास्त भर दिलेला असतो; त्या तुलनेत इतर प्रान त्यांना तितके महत्त्वाचे वाटत नाहीत. अर्थात आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देणाऱ्या दबाव गटांप्रमाणे अन्य काही उद्देशाने अस्तित्वात आलेले दबाव गटही देशाच्या राजकारणात कार्यरत आहेत. उदाहरणार्थ- विद्यार्थी संघटना, सांस्कृतिक गट, धार्मिक संघटना इत्यादी. परंतु हे दबाव गटदेखील आपल्या विशिष्ट उद्दिष्टापुरतेच मर्यादित कार्यक्षेत्र ठेवून काम करीत असतात; त्यामुळे सरकारच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या दवाव गटांची संख्या आपल्या देशात तरी तशी मर्यादितच आहे. दुसऱ्या शब्दांत असे म्हणता येईल की, भारतातील दबाव गट परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत फारशी ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करीत नाहीत; त्यामुळे परराष्ट्र धोरणावर दबाव गटांचा फारसा प्रभाव पडत असल्याचे दिसत नाही.

**उ) विशिष्ट देशांकडे झुकलेले दबाव गट:**

वर म्हटल्याप्रमाणे भारतात सरकारच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या दबाव गटांची संख्या तशी मर्यादित असली तरी अशा प्रकारचे दबाव गट मुळीच अस्तित्वात नाहीत असे म्हणता येणार नाही. काही विशिष्ट देशांशी जवळचे संबंध ठेवणाऱ्या सांस्कृतिक व सामाजिक संघटना येथे कार्यरत आहेत. भारत-अमेरिका मैत्री संघ, भारत-सोव्हिएत युनियन सांस्कृतिक संघटना यांसारख्या नावाने त्यांचे कार्य चाललेले असते. यांपैकी काही संघटना दोन्ही देशांत मित्रत्वाचे व निकटचे संबंध प्रस्थापित व्हावेत, त्यांच्यात सांस्कृतिक आदान-प्रदान व्हावे, दोन्ही देशांत सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत परस्पर सहकार्य करण्यासाठी अनुकूल वातावरण तयार व्हावे, अशा चांगल्या उद्देशाने स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांनी हाती घेतलेले विविध उपक्रम किंवा त्यांच्याकडून राबविले जात असलेले निरनिराळे कार्यक्रम येथील लोकांसाठी काही प्रमाणात उपयुक्त असतात. त्यात आक्षेप घेण्यासारखे काही नसते. तथापि सांस्कृतिक किंवा सामाजिक कार्याच्या नावाखाली आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्नही अशा काही संघटनांकडूनकेला जातो. भारतीय सरकारने विशिष्ट देशाशी चांगले संबंध ठेवावेत म्हणून सरकारवा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मागनि दबाव आणण्याचे कार्य त्या करीत असतात.

**ऊ) आर्थिक दबाव गट आणि परराष्ट्र धोरण :**

अलीकडील काळात भारतीय राजकारणात आर्थिक स्वरूपाच्या दबाव गटाचा प्रभाव जाणवू लागला आहे. अर्थात अशा प्रकारचे दबाव गट पूर्वीही अस्तित्वात होतेच, परंतु ते आताइतके प्रभावी नव्हते आर्थिक उदारीकरणाच्या कालखंडात मात्र आर्थिक स्वरूपाच्या दबाव गटांना महत्वच येऊ लागले आहे. या दबाव गटांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की, त्याचे वरिष्ठ राजकीय पातळीवर लागेबांधे प्रस्थापित झालेले असतात. अनेक राजकीय पक्षनेत्यांशी त्यांचे निकटचे संबंध असतात. राजकीय पक्षांनादेखील आर्थिक दबाव गटांच्या सहकार्याची गरज भासत असते; त्यामुळे देशाची राजकीय सत्ता कोणत्याचे पक्षाच्या हाती गेली तरी सरकारच्या धोरणावर प्रभाव पाडण्यात या गटांना फारशी अडचण जाणवत नाही. आर्थिक स्वरूपाच्या दबाव गटांना मात्र सरकारच्या परराष्ट्र धोरणातों रस असतो. याचे कारण असे की, त्यांचे आर्थिक हितसंबंध सरकारच्या परराष् धोरणाशीही निगडित असतात; त्यामुळे परराष्ट्र धोरणाशी संबंधित काही महत्त्वाच्या प्रश्नांवर सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न या गटांकडून केला जातो.

**ए) संसदीय राजकारण आणि दबाव गट:**

संसदीय राजकारण आणि दबाव गट यांचाही निकटचा संबंध असतो. कायदेमंडळाचे बहुतेक सदस्य राजकीय पक्षांचे प्रतिनिधी म्हणून निवडले गेलेले असतात विशिष्ट पक्षांचे प्रतिनिधी या नात्याने त्यांची निवड झालेली असते. तथापि विशिष्ट राजकीय पक्षाचे सदस्य एवढ्यापुरतीच कायदेमंडळाच्या सदस्यांची ओळख मर्यादित नसते. त्यांच्यापैकी अनेक सदस्य विशिष्ट हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करीत असतात एकाच हितसंबंधाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य निरनिराळ्या राजकीय पक्षांत विखुरले गेलेले असतात. उदाहरणार्थ- कापडधंदा उद्योग लॉबी किंवा शुगर लॉबी यांसारख्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे सदस्यांची निवड निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या वतीने झालेली असते. विधिमंडळ पातळीवर आपल्या विशिष्ट हितसंबंधांच्या रक्षणासाठी है सर्वजण एकत्र येतात. सरकारच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव पाडण्यासाठीही संसदेत अश प्रकारचे काही दबाव गट किंवा प्रचार कक्ष प्रयत्नशील राहतात.

➢ **प्रसारमाध्यमे व परराष्ट्र धोरण:**

परराष्ट्र धोरण निर्धारण प्रक्रियेवर प्रभाव पाडणारा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणून देशातील प्रसारमाध्यमांचा उल्लेख केला जातो. या प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इत्यादींचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे प्रसारमाध्यमांचे महत्त्व अधिकच वाढले आहे. प्रसार-माध्यमांच्या जनमानसावर असलेल्या अशा प्रकारच्या जबरदस्त प्रभावामुळे सरकारदेखील त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही; म्हणून लोकशाही व्यवस्थेतील सरकारला प्रसारमाध्यमांची नेहमीच दखल घ्यावी लागते.

**A) प्रसारमाध्यमांवरील मर्यादा:**

काही वर्षांपूर्वी प्रसारमाध्यमांपैकी वृत्तपत्रांच्या भूमिकेलाच विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. भारतात दूरदर्शनची सुरुवात थोड्याशा उशिरानेच झाली. आकाशवाणीची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळात झाली होती; परंतु स्वातंत्र्यानंतरही आकाशवाणीच्या कार्यक्रमाच्या प्रसारणावर बऱ्याच मर्यादा पडल्या होत्या. आजच्याप्रमाणे आकाशवाणी केंद्रांच्या संख्येत वाढ झाली नव्हती; त्यामुळे देशाच्या सर्व भागांत आकाशवाणीचे कार्यक्रम पोहोचत नव्हते. सर्वसामान्य नागरिकही आकाशवाणीकडे मनोरंजनाचे साधन या दृष्टिकोनातूनच पाहत होते. त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या देशात काही वर्षांपूर्वीपर्यंत आकाशवाणी हे सरकारच्या नियंत्रणाखाली असलेले माध्यम होते. भारतात दूरदर्शनची सुरुवात झाल्यावर काही वर्षे ते सरकारच्या नियंत्रणाखालील माध्यम राहिले होते. परिणामी आकाशवाणी व दूरदर्शन यांना सरकारच्या धोरणांची टीकात्मक समीक्षा करण्याचे किंवा सरकारच्या धोरणाविषयी प्रतिकूल मतप्रदर्शन करण्याचे स्वातंत्र्य घेता येत नव्हते.

**B) वृत्तपत्रांची कामगिरी:**

लोकांच्या प्रबोधनाचे कार्य करण्याच्या बाबतीत भारतीय वृत्तपत्रांनी फार मोठी परंपरा निर्माण केली आहे. अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथील वृत्तपत्रांनी प्रबोधनाच्या कार्याला प्राधान्य देऊन निरनिराळ्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्नांवर लोकांत जागृती घडवून आणण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे. तथापि जुन्या काळात वृत्तपत्रांच्या कार्यालाही काही मर्यादा पडल्या होत्या. आपल्या देशात स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरही अनेक वर्षे साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी होते; त्यामुळे देशातील बहुसंख्य लोकांपर्यंत वृत्तपत्रे पोहोचत नव्हती. वृत्तपत्रांची संख्या व खप मर्यादित असण्याचे हे एक महत्त्वाचे कारण होते.

**C) धोरण-निर्धारणावरील प्रभाव :**

वरील परिस्थितीत अलीकडील काळात थोडाफार बदल झाला आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आकाशवाणी व दूरदर्शन यांवरील सरकारी मक्तेदारी आतासंपुष्टात आली आहे. आकाशवाणी व दरदर्शनच्या अनेक खाजगी वाहिन्या आता आपल्या देशातही सुरू झाल्या आहेत; त्यामुळे या प्रसारमाध्यमाकडून पूर्वीप्रमाणे केवल सरकारी धोरणाचीच री ओढण्याचे कार्य आता होत नाही. तसेच आपल्या देशात साक्षरतेच्या प्रमाणातही आता चांगली वाढ झाली असल्यामुळे वृत्तपत्रांच्या प्रसारातही वाढ झाली आहे. परिणामी, जनमानसावरील वृत्तपत्रांचा प्रभाव पूर्वपिक्षा कितीतरी जास्त वाढला आहे. अलीकडील काळात प्रसारमाध्यमांच्या बाबतीत घडून आलेल्या या परिवर्तनामुळे परराष्ट्र धोरणासारख्या महत्त्वाच्या प्रश्नातही त्यांच्या भूमिकेला महत्त्व येऊ लागले आहे.

**D) परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नांची उपेक्षा:**

वर म्हटल्याप्रमाणे आधुनिक काळात प्रसारमाध्यमांचा जनमानसावरील प्रभाव वाढू लागला असला तरी त्यांच्याकडून परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नांची काही प्रमाणात उपेक्षाच झाली आहे असे म्हणावे लागते. वास्तविक पाहता या क्षेत्रात प्रसारमाध्यमांना आपला प्रभाव सिद्ध करण्यास कितीतरी मोठा वाव आहे; परंतु त्यांनी परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नावर जनजागृती घडवून आणण्याच्या कार्याकडे पुरेशा गांभीर्याने लक्ष दिले नाही. प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांच्या दृष्टीने तर आंतरराष्ट्रीय घडामोडी हा दुय्यम महत्त्वाचा विषय असतो. अत्यंत महत्वाच्या आंतरराष्ट्रीय घडामोडींनादेखील प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रांत कुठेतरी एका कोपऱ्यात जागा दिलेली असते. याचा अर्थ असा की, प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रे आंतरराष्ट्रीय घटना व घडामोडी यांना पुरेशी प्रसिद्धीही देत नाहीत; मग त्या प्रश्नावर साधकबाधक चर्चा करण्याचा किंवा लोकांचे प्रबोधन करण्याचा मुद्दा बाजूलाच राहतो.

**E) संवेदनशील प्रश्नांची योग्य दखल:**

अर्थात भारतातील प्रसारमाध्यमांनी परराष्ट्र धोरणविषयक संवेदनशील प्रश्नांची योग्य दखल अवश्य घेतली आहे. भारत-पाकिस्तान संबंध, भारत-चीन संबंध, भारतात आलेल्या तिबेटी नागरिकांच्या भवितव्याचा प्रश्न, श्रीलंकेतील तामिळ वंशाच्या नागरिकांचा प्रश्न इत्यादी प्रश्नांचे महत्त्व व गांभीर्य भारतीय जनतेच्या लक्षात आणून देण्याच्या कामी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे; त्यामुळे अशा संवेदनशील प्रश्नांवरील परराष्ट्र धोरणाच्या जडणघडणीत प्रसारमाध्यमाचा प्रभाव निश्चितच पडत असतो. सरकारलादेखील आपले धोरण ठरविताना प्रसारमाध्यमांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची दखल घेणे भाग पडते.

**F) प्रसारमाध्यमांच्या भूमिकेचे वाढते महत्त्व:**

परराष्ट्र धोरण निर्धारण-प्रक्रियेत प्रसारमाध्यमांच्या भूमिकेला आता अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. याचे कारण असे की, आपण वर म्हटल्याप्रमाणे अलीकडील काळात माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या क्रांतीमुळे प्रसारमाध्यमे देशातील सर्वसामान्यलोकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. आता दूरदर्शनदेखील चैनीची बाब राहिली नाही अथवा दूरदर्शनकडे त्या दृष्टिकोनातून आता कोणी पाहत नाही. सामान्य व गरीब माणसाच्या झोपडीतदेखील आता दूरदर्शनचा शिरकाव झाला आहे. प्रसारमाध्यमांच्या वाढत्या प्रसारामुळे लोकांच्या मतांवर व विचारांवर त्यांचा प्रभाव पडणे स्वाभाविक आहे. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन या माध्यमांनी मांडलेल्या मतांची नोंद सामान्य लोकही घेऊ लागले आहेत. यातील लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, प्रसारमाध्यमे पूर्वीच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे लोकांचे लक्ष वेधून घेण्याच्या कार्याला आता अधिक प्राधान्य देऊ लागली आहेत. त्यांच्या या कार्यामुळे देशातील सामान्य नागरिकांनादेखील आंतरराष्ट्रीय प्रश्नांत रस वाटू लागला आहे. देशातील प्रसारमाध्यमे परराष्ट्र धोरणविषयक प्रश्नांवर लोकमत जागृत करण्यात बजावत असलेल्या अशा भूमिकेमुळे सरकारलादेखील त्यांची उपेक्षा करणे शक्य होत नाही. अलीकडील काळात परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करताना किंवा परराष्ट्र धोरणाशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांबाबत निर्णय घेताना भारत सरकार प्रसारमाध्यमांनी त्यासंबंधी कोणती भूमिका घेतली आहे याकडेही लक्ष देत असते. सरकारने घेतलेल्या एखाद्या निर्णयासंबंधी प्रसारमाध्यमांतून मोठ्या प्रमाणावर टीका होऊ लागली किंवा प्रसारमाध्यमांनी त्यावर प्रतिकूल मतप्रदर्शन केले तर आपल्या निर्णयात बदल करण्याचीही तयारी सरकार ठेवते; म्हणून परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणात प्रसारमाध्यमांनादेखील महत्त्व प्राप्त झाले आहे.

**G) माध्यमांवरील खाजगी मालकी व परराष्ट्र धोरण:**

प्रसारमाध्यमांवरील खाजगी मालकी व परराष्ट्र धोरण या दोन गोष्टींचाही परस्परसंबंध आहे. आपल्या देशातील वृत्तपत्रे खाजगी मालकीची आहेत. काही वृत्तपत्रांची मालकी तर देशातील मोठ्या औद्योगिक समूहांकडे आहे. अशा वृत्तपत्रांना भांडवलाची समस्या जाणवण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. साहजिकच अशी वृत्तपत्रे एकाच वेळी देशातील अनेक शहरांतून प्रकाशित होतात. या वृत्तपत्रांना 'साखळी वृत्तपत्रे' असेही संबोधले जाते. वृत्तपत्रांप्रमाणेच आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसारमाध्यमांवरदेखील खाजगी क्षेत्राने आपली मालकी प्रस्थापित केली आहे.

**H) हितसंबंधांच्या रक्षणासाठी वापर :**

प्रसारमाध्यमांवर आपली मालकी प्रस्थापित करणारे विविध औद्योगिक समूह त्या माध्यमांचा वापर स्वतःचे विशिष्ट हितसंबंध जपण्यासाठी करणे अगदी स्वाभाविक असते. आपणास या गोष्टीचा प्रत्यय परराष्ट्र धोरणाबाबतही येतो. देशातील मोठे औद्योगिक समूह परराष्ट्र धोरणासंबंधी काही पूर्वग्रहबाळगून असतात. तसेच या औद्योगिक समूहांचा कल काही विशिष्ट देशांच्या बाजूर असतो. ज्या परराष्ट्रांशी निकटचे संबंध प्रस्थापित होण्यात आपले हितसंबंध जपले जाणार आहेत असे त्यांना वाटते त्या राष्ट्रांशी अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी हे औद्योगिक समूह आपल्या मालकीच्या प्रसारमाध्यमांमार्फत सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करू लागतात; त्यामुळे सरकारलादेखील तशा प्रकारचे धोरण आखणे भाग पडते. देशातील बड्या उद्योगसमूहांच्या दबावापुढे भारत सरकारने परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणातील प्रसारमाध्यमांच्या प्रभावाच्या या पैलूची नोंद घेणेही आवश्यक ठरते.

- **भारतीय परराष्ट्र धोरणावर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव:**

भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकासामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव झालेला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात होणारे बदल हे भारतीय परराष्ट्र धोरणाच्याही धोरणात्मक बदलावर झालेले आहे, ते पुढीलप्रमाणे :-

**१. स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय काँग्रेसचा भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

ब्रिटीश साम्राज्यवादी व्यवस्थेत राष्ट्रीय काँग्रेसच्या निर्णयावर भारतीय परराष्ट्र धोरण ठरत होते. यात ब्रिटीश शासनाने शेजारी राष्ट्राच्या अंतर्गत भागात केलेला हस्तक्षेप, निषेध, तहासंबंधीचे मत, पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या स्थापनेतील सहभाग, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सदस्यत्व, महिला व्यापाराविषयी करारावर स्वाक्षरी, जर्मन, इटलीच्या लष्करशहाचा विरोध इत्यादी विविध आंतरराष्ट्रीय घटकांवर राष्ट्रीय काँग्रेसचा परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेवर प्रभाव पडला होता.

**२. स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

स्वातंत्र्यानंतर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेवर आंतरराष्ट्रीय राजकारणात दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा प्रभाव पडला. यातूनच अलिप्तता, साम्राज्यवादविरोधी, वंशविरोध, आंतरराष्ट्रीय शांतता व सहअस्तित्त्व, अहस्तक्षेपही धोरणे भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्त्वे बनली. यांचा प्रभाव परराष्ट्र धोरणाच्या निर्णय प्रक्रियेवर पडत असतो.

**३. शीतयुद्ध काळात भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात सुरू झालेल्या शीतयुद्धाचा प्रभाव पडला. त्यावेळी भारतीय परराष्ट्र धोरणात नववसाहतवादाला विरोध, वंशवादाला विरोध, शस्त्रास्त्र स्पर्धेला विरोध, अण्वस्त्रांना विरोध हे धोरण ठरवण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण संघर्षाचा नसून शांततेचा आहे.

**४. शीतयुद्धोत्तर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरण शीतयुद्धानंतर बदललेले दिसते. आंतरराष्ट्रीय राजकारणात झालेले बदल, जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचा प्रभाव यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हिताला' महत्त्व प्राप्त झाले व व्यापार हा घटक महत्त्वपूर्ण झाला. तसेच पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार, दहशतवाद, अण्वस्त्राचा प्रसार रोखणे या आंतरराष्ट्रीय मुद्यांचाही प्रभाव भारतीय परराष्ट्र धोरणावर झाला.

**५. २००० नंतर भारतीय परराष्ट्र धोरणावर प्रभाव :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिकीकरण प्रक्रियेच्या १० वर्षानंतर भारतीय परराष्ट्र धोरणात विविध बदल झाले. अणु परिक्षणानंतर भारतीय परराष्ट्र व्यापारावर सन २००२ निर्बंध घातले. त्यांचा परिणाम २००८ साली भारत-अमेरिका अणुकरार होय. तसेच 'दहशतवाद', 'चीनचे विस्तारवादी धोरण', 'हिंदी महासागरमधील बदलते संदर्भ', 'सागरी संरक्षण', 'ब्रीक्स'सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती इत्यादी सर्वांचा प्रभावाने भारतीय परराष्ट्र धोरण कधी वास्तववादाकडे राष्ट्रीय हिताकडे मार्गक्रमण करताना आढळते.

अशा पद्धतीने भारतीय परराष्ट्र धोरणावर इतर देशांशी संबंध निर्माण करताना आंतरराष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव दिसतो व त्यात बदलत्या परिदृश्यानुसार परराष्ट्र धोरणात बदल करावे लागतात.

- **भारतीय परराष्ट्र धोरणावर व्यापाराचा प्रभाव :**

**'व्यापार'** हा प्राचीन काळापासून विविध देश एकमेकांशी करतात. आधुनिक काळात 'व्यापार' हा प्रमुख घटक परराष्ट्र धोरणाच्या प्रक्रियेत असून यावरून परराष्ट्र धोरणाची दिशा ठरत असते. व्यापारामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच देशांतर्गत व्यापार हा परराष्ट्र धोरणाच्या धोरण निश्चितीवर प्रभाव पाडत असतात. भारताचे परकीय व्यापार धोरणातूनच भारताची परराष्ट्र धोरणाची दिशा प्राप्त होते. स्वातंत्र्यपूर्वकाळामध्ये भारताचे परकीय व्यापार धोरण पूर्णपणे ब्रिटीश सरकारच्या मर्जीवर अवलंबून होते. मात्र स्वातंत्र्यानंतर भारतीय व्यापार धोरणात बदल झाला. भारताला आपला विकास करण्यासाठी विदेशी व्यापाराची गरज निर्माण झाली, त्यामुळे भारताने सुरवातीच्या काळात परराष्ट्र धोरणात 'अलिप्तता' स्विकारली व जागतिक राजकारणात दोन्ही गटात न सामील होता दोन्ही गटाकडून मदत मिळवण्याचे धोरण अवलंबले व त्यानुसार भांडवलशाही व साम्यवादी गटातील देशांशी व्यापारी धोरण राबवले. या व्यापारी धोरणात देशांतर्गत निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन दिले. स्वदेशी मालास प्राथमिकता देताना इतर देशांबरोबर द्विपक्षीय व बहुपक्षीय करार केले.

सन **१९९१** ला आर्थिक सुधारणा लागू केल्यानंतर प्रथम सन १९९२-९७ ला पहिले पंचवार्षिक आयात-निर्यात धोरण घोषित केले गेले. या धोरणात 'उदारीकरण व स्वावलंबन' हा मुख्य उद्देश होता. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल झाला व व्यापारी उद्देशाने भारताने **'फोकस लॅटिन अमेरिका'** धोरण स्वीकारले, तसेच दुसरे आयात - निर्यात व्यापारी धोरण सन १९९७ - २००२ ला जाहीर झाले. या धोरणामुळे भारताने 'फोकस सी.आय.एस.' ही योजना

कार्यान्वित केली. तसे 'लुक ईस्ट' पॉलिसी जाहीर केले. ज्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आसियान देशांना महत्त्व प्राप्त झाले व त्यांच्याविषयी धोरण ठरवण्यास सुरवात झाली. भारताचा सहभाग आसियान शिखर संमेलनमध्ये होवू लागला.

सन **२००४-०९** मध्ये नवीन असे **'परकीय व्यापार धोरण** जाहीर झाले. या व्यापार धोरणामध्ये परकीय चलनाप्रमाणेच 'आर्थिक वृद्धी' निर्माण करणे, निर्यातीत जागतिक हिस्सा वाढवण्याचे धोरण होते. या धोरणामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात आफ्रिका खंडातील देशाबद्दल व्यापारी दृष्टिकोन अवलंबला गेला व या देशांशी संबंध दृढ करायला सुरुवात केली. भारताचा व्यापार जगातील विविधदेशांशी बाढू लागल्याने त्याचा परिणाम भारतीय परराष्ट्र धोरणातील विविध देशांशी असलेल्या संबंधावर पडू लागला. जसे, भारत-चीन व्यापार हा सर्वात जास्त आहे. त्यावेळी सीमा विवाद प्रश्नात संघर्ष झाला तरी तो टोकाचा संघर्ष होत नाही, त्यावर व्यापारी संबंध प्रभावित करत असतो. तसेच भारत ही जागतिक बाजारपेठ असल्याने आज प्रत्येक देश भारताशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या या व्यापारी घटकामुळे अमेरिका, चीन, आसियात राष्ट्र, रशिया, जपान इ. राष्ट्र भारताशी संघर्षाचे नसून चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. व्यापार धोरणाचा अप्रत्यक्ष व प्रत्यक्षरित्या भारतीय परराष्ट्र धोरणावर मोठा प्रभाव पडतो. अशाप्रकारे 'व्यापार' हा घटक भारतीय परराष्ट्र धोरणाला प्रभावित करू शकतो.

- **भारतीय परराष्ट्र धोरणावर आर्थिक प्रभाव:**

भारताने उदारीकरणाचा स्विकार केल्यानंतर भारत एक जागतिक बाजारपेठ म्हणून उदयास येवू लागली व भारत आज जगातील सर्वात मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयास आली आहे. यामुळे परराष्ट्र धोरणाच्या विविध घटकांबर आर्थिक प्रभाव पडला तो पुढीलप्रमाणे:-

**१. १९९१ नंतर 'आर्थिक' विषय परराष्ट्र धोरण :-**

भारतीय परराष्ट्र धोरणात १९९१ मध्ये 'खाऊजा'चा स्विकार केल्यानंतर देशांतर्गत विकास, आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे परराष्ट्र धोरणात 'आर्थिक' घटक प्रामुख्याने प्रस्तावित केले गेले व या धोरण विविध देशांशी संबंध प्रस्थापित करताना 'आर्थिक' घटकाला महत्त्व दिले गेले.

**२. 'आर्थिक 'घटकाचा परराष्ट्र धोरणातील आदर्श तत्त्वावर प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणात पंचशील, अलिप्तता, मानवी सहकार्य, वंशवाद इ. आदर्श मूल्याचा प्रभाव सुरवातीपासून दिसून येतो, पण 'आर्थिक' घटकाचा प्रभाव वाढल्याने परराष्ट्र धोरणात भारत इतर देशाशी संबंध प्रस्थापित करताना या घटकाकडे काही प्रमाणात दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास येते, जसे म्यानमारमधील आकारान प्रांतातील मानवी हक्काच्या उल्लंघनाबाबत भारताचे मौन, श्रीलंकेतील वंशवाद, इरार्षामधील संघर्ष इ. घटनाबाबत भारताचे 'आर्थिक' घटक प्रभावी ठरत आहे.

**3. 'आर्थिक' घटकामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात नवीन धोरणाचा उदय :-**

भारतीय परराष्ट्र धोरणाला 'आर्थिक' घटकाला महत्त्व दिल्याने भारत इतर देशांशी संबंध प्रस्थापित करताना धोरण राबवले आहे. यात भारताने आसियत देशातील विविध देशांशी संबंध प्रस्थापित करताना 'पूर्वेकडे पहा' हे धोरण राबवले. यानुसार आसियान संघटनेचा सहभागी सदस्य बनवून 'आर्थिक संबंध प्रस्थापित केले. १९९१ नंतर भारताने अमेरिकेबरोबर संबंधाची पुर्नरचना करताना भारताने 'आर्थिक व्यवस्थेचा विचार केला.

**४. जागतिक आर्थिक संघटना व परिषदेमध्ये सहभाग :-**

भारतीय परराष्ट्र धोरणावर 'आर्थिक' प्रभावामुळे भारताच्या परराष्ट्र धारेणाने जगातील विविध संघटनात भाग घेतला. ज्यात ब्रिक्स, 'आर्थिक व्यापार संघटना' यांचा भारत सदस्य आहे. तसेच युरोपियन युनियन शिखर परिषद, आफ्रिकन युनियन शिखर परिषद, आसियत शिखर परिषद, शांघाई संघटनेत सहभागी सदस्य अशी विविध संघटना व परिषदेमध्ये भारत 'आर्थिक' घटकामुळे सहभाग होत आहे.

**५. नवीन जागतिक बाजारपेठ म्हणून उदय :-**

भारताच्या उदारीकरण धोरणामुळे देशांतर्गत विकास वाढत आहे. आज भारत जागतिक बाजारपेठ म्हणून उपलब्ध आहे. यामुळे प्रत्येक देश भारताशी संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. याच्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणात बदल घडते आहे. भारत आपले आर्थिक हिताच्या दृष्टीने विविध देशांशी संबंध प्रस्थापित करत आहे.

**६. परराष्ट्र धोरणातील इतर घटकावर 'आर्थिक' घटकामुळे प्रभाव :-**

भारतीय परराष्ट्र धोरणानी विविध नैसर्गिक, विचारधारा, सीमा, हवामान इ. घटक निर्धारक असले तरी यांच्यापेक्षा 'आर्थिक घर्तक' जास्त प्रभावी ठरत आहे. भारताचे शेजारील राष्ट्राबरोबर सीमा विवाद आहेत. जसे भारत-चीन सिमा विवाद तरीपण या विवादाला कधीच युद्धाचे स्वरूप आले नाही, त्याचे कारण 'आर्थिक हितसंबंध' आहेत. तसेच म्यानमारबरोबर असलेले संबंधात आता 'आर्थिक' घटक प्रभावी ठरत आहेत.या पद्धतीने भारताच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक घटक प्रभावी ठरत आहे. भारतावर अणुस्फोटानंतर आलेले निर्बंध 'आर्थिक' घटकाच्या प्रभावाने दूर झालेले आहेत. अलिकडे परराष्ट्र धोरणावर 'आर्थिक घटक' प्रभावी ठरत असून आंतरराष्ट्रीय व्यापाराची भूमिकाही परराष्ट्र धोरण प्रभावित करते तसेच राजकारणाचाही प्रभाव पडतो. अशा प्रकारे भारतीय परराष्ट्र धोरणावर विविध घटकाचा प्रभावातून परराष्ट्र धोरणाची दिशा ठरते.

# घटक क्र. ३

## शीतयुध्दोत्तर काळातील भारताचे इतर राष्ट्रांशी संबंध

- **प्रस्तावना :**

प्रत्यक्ष युद्ध टाळून धमक्या, जहाल प्रचार, छुप्या विध्वंसक कारवाया इत्यादींचा अवलंब करणारा मूलतः अमेरिका व सोव्हिएट रशिया या दोन महासत्तांमधील राजकीय संघर्ष किंवा शत्रुत्व म्हणजेच शीतयुद्ध होय. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवलशाही राष्ट्रे आणि सोव्हिएट रशियाच्या नेतृत्वाखालील साम्यवादी राष्ट्रे अशा दोन राष्ट्रगटांतील संघर्षात शीतयुद्धाची सुरुवात झाली. साधारणपणे सन १९९० मध्ये शीत युद्धाची समाप्ती झाली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक राजकारणात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. जगातील तणाव व संघर्ष कमी होईल असे वाटत होते; परंतु जगातील अनेक भागामध्ये विविध समस्या निर्माण झाल्या त्यामध्ये दहशतवाद, वाशिक संघर्ष, निर्वासित, पर्यावरण, सत्ताधाऱ्याविरोधी जनतेचा उठाव इ. अनेक समस्या निर्माण झाल्या. याचा परिणाम भारतावर व भारताच्या शेजारी देशांवरही झाला. परिणामी भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार करावा लागला. याच कालखंडात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला अधिक वेग आला विभागीय पातळीवर अनेक व्यापारी संघ उदयास आले. अनेक देशानी आपल्या अर्थव्यवस्था खुल्या केल्याने परस्पर आर्थिक सहकार्य वाढीस लागले. अनेक राष्धानी विचारासरणी आणि राजकीय हितसवधापेक्षा आर्थिक व व्यापारी हितसंबंधांच्या रक्षणाला प्राधान्य दिले. सोचिएट रशियाचे, युगोस्लाविया व चेकोस्लोवाकीयाचे विघटन झाले जर्मनीचे एकत्रीकरण झाले पूर्व युरोपातील अनेक देशानी लोकशाही व्यवस्था स्वीकारली. या काळात अशासकीय संस्था व संघटनांचा प्रभाव वाढलेला दिसून येतो. या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदलते प्रवाह लक्षात घेऊन भारताला आपल्या परराष्ट्र धोरणाचा नव्याने विचार करावा लागला आहे.

- **शीतयुद्धोत्तर काळातील भारताचे अमेरिकेशी सबंध:**

सन १९९१ मध्ये सोव्हिएत संघाचा विघटन झाल्यानंतर जागतिक राजकारणात आमूलाग्र बदल झाले. द्विधृवीय जगाचा अंत होऊन एकमेव अमेरिका एकसत्ता व्यवस्था उदयास आली. या पार्श्वभूमीवर शीतयुद्ध काळात मर्यादित राहिलेले भारत–अमेरिका संबंध शीतयुद्धोत्तर काळात नव्या दिशेने विकसित झाले.

- **पी.व्ही. नरसिंहराव सरकारचे परराष्ट्र धोरण (१९९१ ते १९९६)**

भारतातल्या परराष्ट्र धोराणाच्या बदलानी सुरुवात नरसिंहराव यांच्या काळात झाली. त्यानी भारताची अर्थव्यवस्था खुली करण्यास प्रारंभ केला. तसेच परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे निश्चित करून त्यानुसार भारताच्या परराष्ट्र धोरणात राजकीय हितसंबंधांपेक्षा आर्थिक हितसंबंधांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. विचारसरणी व आदर्शवादाऐवजी वास्तववादावर भर देण्यात आला. एकधुवी जगामध्ये अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्यावर भर देण्यात आला.

- **अटलबिहारी वाजपेयींचा काळ :**

भारतीय जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर मे 1998 मध्ये पोखरण अणूचाचणी यशस्वी पार पडली. भारताच्या या कृत्यावर अमेरिका चिडली व भारतावर आर्थिक निर्बंध लादले. सि.टी.बी.टी. करारावर स्वाक्षरीसाठी दबाव आणला. पुढे मार्च 2000 ला बिल क्लिंटन भारताच्या भेटीवर आले. सुमारे 4 हजार कोटी डॉलर्स व्यापारी करारावर सहया झाल्या व नव्या संबंधाचा अध्याय सुरू झाला. कश्मीर प्रश्न द्विपक्षी असल्याचे मान्य करून भारताला सुरक्षा समितीत कायम सदस्यत्व

देण्यास अमेरिकेने भारताचा सहानुभूतीपूर्वक विचार करेल. वाजपेयी क्लिंटन यांनी 'व्हिजेन स्टेटमेन्ट' प्रसिध्द केले. नंतर वाजपेयींचा अमेरिकन दौरा त्यात ई-कॉमर्स व बँकींग क्षेत्रातील प्रकल्पासाठी 6 अब्ज डॉलरच्या करारावर सहया झाल्या. नंतर जॉर्ज डब्ल्यु बुश सत्तेवर आले. परंतु त्यांचे पाकिस्तान धार्जिण्ये धोरण बदलले नाही. मुर्शरफला चांगल्या वर्तनाचे शिफारस पत्र देऊन त्यातभर घातली. 13 डिसेंबर 2001 मध्ये भारतीय संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा गांभिर्याने विचार केला नाही. 2002 मध्ये जॉर्ज फर्नाडीस, लालकृष्ण अडवाणी अमेरिकन दौऱ्यावर गेले. शिवाय पावोल हे भारताच्या दौऱ्यावर येऊन वाजपेयींशी चर्चा करून संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. विशेषता भारत-पाकिस्तान संबंधात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. 11 सप्टेंबर 2001 हा दिवस आंतराष्ट्रीय राजकारणाची समीकरण बदलणारा दिवस आहे. यादिवशी मुस्लीम दहशतवादयांनी अमेरीकेच्या जागतिक व्यापार केंद्र व पेंटागानवर हल्ला केला. या घटनेनंतर अमेरिकेने जी करावाई केली. त्यास भारताने पुर्णपणे पाठिंबा दिला.

- **डॉ. मनमोहनसिहांचा काळ :-**

मनमोहनसिहाच्या काळात भारत-अमेरिका संबंध सुधारण्यास चालना मिळाली व भारत अमेरिका संबंध दृढ झाले. एप्रिल 2005 मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री नटवरसिंह अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले व या दौऱ्यादरम्यान द्विपक्ष संबंध घट्ट करण्याचे संकेत दिले गेले. 14 एप्रिल 2005 मध्ये भारताने अमेरिकेसोबत एक ऐतिहासिक हवाई सेवा समझोता करार केला हा करार म्हणजे दोन्हीं देशामधील हवाई उड्डानासंदर्भात ज्या काही अडचणी असतील त्या दूर होतील असे ठरले 28 जून 2005 रोजी पारंपारिक संरक्षणासंबंधी एक करार झाला व त्याकरारावर भारत व अमेरिकेने वॉशिग्टन येथे सही केली. 18 ते 20 जुलै 2005 च्या अमेरिका दौ-याच्यावेळी डॉ. मनमोहनसिंह व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांच्यात बैठक झाली व त्याबैठकीत भारताला जगाच्या पातळीवर आर्थिक, सामरिक व बौध्दिक क्षेत्रात नवीन उदयास येणारी शक्ती म्हणून मान्यता देण्यात आली. 18 जुलै 2005 रोजी भारत व अमेरिकेच्या दरम्यान महत्वपूर्ण असा नाभिकीय उर्जा समझौता करार झाला. भारताने जेव्हा 1974 मध्ये परमाणू विस्फोट घडवून आणला, तेव्हा अमेरिकेने भारताला नाभिकीय क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकारची मदत केली नाही. उलट भारतावर प्रतिबंध लावले. 1 ते 3 मार्च 2006 मध्ये उच्चस्तरीय प्रतिनिधीसोबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यु बूश भारताच्या दौऱ्यावर आले. तेव्हा मनमोहनसिंहांच्या सोबत बैठक झाली व या बैठकीत संयुक्त घोषणापत्रमध्ये भारत व अमेरिका यांच्यातील परमाणू उर्जा क्षेत्रामध्ये 18 जुलै 2005च्या करारानुसार दोन्ही देशांनी एकमेकांना मदत करावी अशी इच्छा बोलून दाखवली. अमेरिकेन कनिष्ठ सभागृह कॉग्रेसमध्ये प्रतिनिधीनी भारताच्या सोबत झालेला परमाणू सहमतीला मंजुरी दिली. नंतर तो प्रस्ताव वरीष्ठ सभागृह सिनेट मध्ये मंजुरीसाठी पाठविण्यात आला. या सर्व घडामोडीवरून डॉ. मनमोहनसिंहांनी आपल्या देशातील कायदेमंडळातील लोकप्रतिनिधींना 27 जुलै 2006ला सांगितले की, भारत परमाणू समझोताच्या बाबतीत कोणताही फेरबदल झाला तरी मंजुरी देणार नाही असे अमेरिकेला स्पष्ट सांगितले.

- **नरेंद्र मोदींजींचा काळ :-**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात भारत-अमेरिका संबंध अधिक मजबूत आणि उत्तम झाले आहेत. दोन्ही देशांनी लोकशाही आणि दहशतवादाविरोधी बाबत असलेली कटिबध्दत्ता हा अमेरिकेच्या दृष्टिने अतिशय महत्वाचा भाग असल्याने भारत हा अमेरिकेचा नैसर्गिक मित्र आहे असे व्हाईट हाऊसचे माध्यम उपसचिव राजशहा यांनी म्हटले. नरेंद्र मोदी यांची मनिला येथे असिआन परिषदेच्या निमित्ताने बैठक झाली. डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळात दोन्ही देशांचे संबंध अधिक मजबूत झाले असून ते अधिक मजबूत होत गेले. अमेरिका आणि चीनच्या संबंधापेक्षा भारत आणि

अमेरिका यांच्या संबंधात अनेक समान दुवे आहेत. मोदी यांच्याशी डोनाल्ड ट्रम्प यांचे संबंध उत्तम प्रकाराचे होते. जगातील ट्रम्प यांना जे नेते आवडतात. त्यात मोदींचा समावेश होता. डोनाल्ड ट्रम्प मोदींवर प्रभावित होऊन दोन्ही देशातील संबंध सुरक्षेच्या मुद्द्यापासून आर्थिक मुद्द्याकडे वळले आहेत. तसेच या दोन्ही देशांचे लष्करही जगातील सर्वोत्तम असले पाहिजे यावर नरेंद्र मोदी व डोनाल्ड ट्रम्प यांनी भर दिला आहे. तसेच इंडो-पैसिफिक भाग मुक्त आणि खुला असला पाहिजे यावरही दोन्ही नेत्यात एकमत झाले. भारत अमेरिकेकडून तेल खरेदी करीत असल्याबद्दलही ट्रम्प यांनी आनंद व्यक्त केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमेरीकेचे विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडन या दोन्हीं नेत्यांच्या संवादातून द्विपक्षीय धोरण ठरविण्यावर भर देण्यात आला आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका हे चार देश एका विशेष गटाची स्थापना करण्यासाठी मंत्री स्तरावरील बैठकीदरम्यान एकत्र आले होते. नियमबध्द, आंतराष्ट्रीय व्यवस्था प्रादेशिक अखंडता व सार्वभौमत्व, कायदयाच्या चौकटीतील नियम पारदर्शकता, आंतराष्ट्रीय सीमांच्या पलीकडे समुद्री वाहतुकीसाठी स्वातंत्र्य आणि मतभेदाचे शांततामय मार्गाने निराकरण इत्यादी मुद्द्यांशी बांधीलकी असल्याचे या बैठकीत अधोरेखित करण्यात आले. ज्यो बायडन प्रशासनच्या प्रारंभीच्या काळात या प्रकारची बैठक घेण्यात आल्याने अमेरिकेकडून या विषयाच्या व्याप्तीला प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट केले. तसेच वातावरणातील बदल आणि भारत प्रशांत महासागरीय देशादरम्यान स्वतंत्र व खुले वातावरण बायडन प्रशासनासाठी आधीच्या ट्रम्पप्रशासनाशी असलेले मतभेद अघोरखित करण्याचा सर्वात गंभीर मार्ग म्हणजे हवामान बदलविषयक नव्या कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करणे हा होय. चीनच्या आक्रमक उदयाच्या पार्श्वभूमीवर मोदी आणि बायडन यांनी नियमाधारित आंतराष्ट्रीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी समाविचारी देशासह काम करण्यास महत्व असल्याच्या मुद्द्यांवर भर दिला. जो बायडन प्रशासनाने कार्यभार स्वीकारल्यावर भारतासोबत घेतलेली भूमिका अधिक मजबूत आणि ठाम आहे.

भारत-अमेरिका संबंधात सर्वसाधारणपणा आला नाही उलट त्यानतरही अमेरिकेने भारत विरोधीच भूमिका घेतली. अमेरिकेने रशियास 1990 नंतर जी आर्थिक मदत दिली. त्याचा वापर रशियावर दबावासाठी केला भारताची वाढती शक्ती कमी करणे हाच अमेरिकेच्या धोरणाचा भाग 1990 नंतर म्हणजे शितयुध्दानंतर राहिला व्यापक परिक्षण बंदी करार अर्थात सि.टी.बी.टी. वर भारताने स्वाक्षरी करावी यासाठी अमेरिकेने अनेक प्रकारे दबाव आणला प्रतिबंध घालण्यापर्यंत प्रयत्न केले. भारताने मात्र सि.टी.बी.टी. वर स्वाक्षरी केली नाही. परिणामतः दोन देशातील संबंध सर्वसाधारण झाले नाही. पण भारताविरोधी तिव्र भूमिका घेणे अमेरीकेने सोडले भारत-पाक मधील कश्मीर प्रश्नावर सतत पाकची बाजू घेण्या-या अमेरिकेने कारगीलच्या प्रश्नावर पाकची बाजू घेतली नाही.अमेरिकेने पाकिस्तानवर दबाव आणला व कारगीलमधून सैन्यमागे घेण्यास भाग पाडले. सन १९९८ मध्ये भारताने पोखरण येथे परमाणू विस्फोट परिक्षण केले. भारत-अणूवस्त्रधारी राष्ट्रांच्या रांगेत जाऊन बसला जगावर अणवस्त्रांच्या क्षेत्रात आपली मक्तेदारी असावी असे वाटणात्या अमेरीकेस हे आवडले नाही. अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर भारतावर आर्थिक प्रतिबंध लादले दक्षिण आशियात भारताची ताकद वाढू नये या अमेरीकेच्या भूमिकेमुळे दोन देशातील संबंध सर्वसाधारण झाले नाही.

- **शीतयुद्धोत्तर काळातील भारत आणि युरोपियन युनियन (EU):**

युरोपियन युनियन अर्थात **युरोपियन महासंघ** ही युरोप खंडातील २७ देशांची एक राजकीय आणि आर्थिक संघटना आहे. ही संघटना **१९९३** मध्ये मास्ट्रिच कराराद्वारे औपचारिकपणे स्थापन झाली आहे. परंतु, तिची सुरुवात १९५० च्या दशकात झाली आहे. युरोपियन कोळसा व पोलाद समुदाय (European Coal and Steel Community), युरोपियन

आर्थिक समुदायापासून (European Economic Community) याची सुरुवात झाली. युरोपियन महासंघातील सदस्य देशांमध्ये शांतता, स्थैर्य व आर्थिक समृद्धी निर्माण करणे हे या संघटनेचं प्रमुख उद्दीष्ट आहे. युरोपियन महासंघात **एकूण २७** सदस्य देश असून संघनेचं काम २३ भाषांमध्ये चालतं. संघटनेने २३ भाषांना अधिकृत भाषेचा दर्जा दिलेला आहे. युनायटेड किंगडम हे युरोप खंडातील बलाढ्य राष्ट्र पूर्वी युरोपियन महासंघाचं सदस्य राष्ट्र होतं. मात्र **३१ जानेवारी २०२०** रोजी ब्रेक्झिटनंतर हा देश युरोपियन महासंघातून बाहेर पडला.

- **युरोपियन महासंघातील सदस्य राष्ट्रांना असलेले अधिकार :**

युरोपियन महासंघातील सदस्य देशांना संघटनेने आर्थिक, राजकीय अधिकार प्रदान केले असून निर्णय प्रक्रियेत सहभाग व मतदानासह इतरही अधिकार दिले आहेत.सदस्य देशांना वस्तू, सेवा, भांडवल व लोकांच्या मुक्त संचलनाचा अधिकार आहे. यामुळे व्यापार व गुंतवणुकीला चालना मिळते. युरोपियन महासंघातील २० देशांनी युरो हे चलन स्वीकारलं असून त्यामुळे आर्थिक स्थैर्य व व्यापार सुलभ होतो. प्रत्येक सदस्य देशाला युरोपियन संसदेत आपला प्रतिनिधी पाठवण्याचा, महासंघाच्या धोरणांवर प्रभाव टाकण्याचा अधिकार आहे. सदस्य देशांना युरोपियन युनियनच्या निर्णय प्रक्रियेत मतदान करण्याचा व व्हेटोचा अधिकार आहे. व्हेटो एखाद्या देशाच्या प्रतिनिधीला किंवा देशाला दुसऱ्या प्रतिनिधीच्या किंवा देशाच्या निर्णयाला नकार देण्याचा अधिकार असतो. देशांना पर्यावरण, संशोधन, सुरक्षा व संरक्षण यांसारख्या क्षेत्रात एकत्रित धोरणांचा लाभ घेण्याचा अधिकार आहे. महासंघाच्या निधीतून उदाहरणार्थ रिजनल डेव्हलमेंट फंडाच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळते.

- **युरोपियन महासंघातील नागरिकांचे अधिकार:**

सदस्य राष्ट्रांमधील नागरिकांना युरोपियन कोर्ट ऑफ जस्टिसमध्ये दाद मागण्याचा अधिकार आहे. युरोपियन महासंघातील सदस्य राष्ट्रांमधील नागरिकांना कोणत्याही देशात राहण्याचा, काम करण्याचा व शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. या सर्वांना युरोपियन मानवाधिकार संघटनेचं संरक्षण मिळतं. याबरोबरच युरोपियन युनियनच्या प्रशासनात प्रातिनिधीक लोकशाहीचे तत्त्व अवलंबिण्यात आले आहे. या लोकशाहीचे खालील आधारस्तंभ आहेत.
१) युरोपीयन संसद., २) युरोपीयन आयोग., ३) युरोपीयन युनियन परिषद., ४) युरोपीयन परिषद. अशा पद्धतीने युरोपियन युनियनने शांतता, स्थैर्य आणि भरभराटीचे कार्य उत्तमपणे बजावले आहे. युरोपातील शांतता, सलोखा, लोकशाही आणि मानवी हक्क या क्षेत्रातील कार्याबद्दल **२०१२ चा शांततेचे Nobel पारितोषिक** देण्यात आला.

- **भारत आणि युरोपियन महासंघ (EU) यांचा संबंध :**

१९९१ साली भारताने नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केला. भारतामध्ये आर्थिक उदारीकरणाची व मुक्तपणाची प्रक्रिया सुरू झाली. भारतीय बाजारपेठ जगभरातील गुंतवणूक व भांडवलासाठी खुली झाली. या नव्या आर्थिक व औद्योगिक धोरणाचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र धोरणावरही पडला. युरोपातील राष्ट्रांशी भारताचे औद्योगिक, कृषी, तंत्रज्ञान, पर्यावरण व ऊर्जा या क्षेत्रांत परस्परहिताचे संबंध प्रस्थापित झाले.

१. २८ जून २००७ पासून भारत आणि युरोपियन युनियन दरम्यान BTIAC (Bilateral Trade and Investment Agreement) हा करार चर्चाधीन आहे. द्विपक्षीय वस्तू व्यापार, सेवा, गुंतवणूक वाढण्यासाठी दोघांमध्ये चर्चा सुरू आहे.

२. भारत आणि दरम्यान होणाऱ्या चर्चेत पुढील विषय आहेत. व्यापार सरलीकरण, व्यापार अडथळे, व्यापार सहकार, स्पर्धा शासकीय वसुली तंटा निवारण.

३. युरोपमधील स्वित्झर्लंड, लियेनस्टीन, नॉर्वे, आईसलँड यांनी एक युरोपीयन मुक्त व्यापार क्षेत्र निर्माण केले आहे. भारताने या क्षेत्रासोबत TEPA (Trade and Partnership Agreement) करार केला आहे. नोव्हेंबर २०१३ मध्ये TEPA अंतर्गत नवी दिल्लीत बैठक पार पडली. लवकरच हा करार लागू होण्याची शक्यता आहे.

४. २०१५-१६ साली भारताच्या निर्यातीत युरोपियन युनियनचा १७१% वाटा होता. यात प्रामुख्याने रत्ने, दागिने, मौल्यवान खडे, मौल्यवान धातू या गटांचा समावेश होतो. २०१५-१६ साली भारताच्या आयातीत युरोपियन युनियनचा बाटा ११.५ होता.

५. युरोपीयन युनियन मध्ये भारताचा सर्वाधिक व्यापार जर्मनी व त्या खालोखाल इंग्लंड सोबत आहे. जर्मनी हा भारताच्या आयातीतला मोठा भागिदार तर इंग्लंड हा भारतातून होणाऱ्या निर्यातीतला सर्वात मोठा भागिदार देश आहे.

६. २०१७ साली भारत व यूरोपीय युनियनमध्ये ९१.५२ असा डॉलरचा व्यापार झाला.

❖ **शीत युद्धानंतर भारत - रशिया संबंध:**

शीत युद्धानंतर भारत-रशिया संबंध सोव्हिएत संघाच्या १९९१ च्या विघटनानंतर सुरुवातीला आव्हानात्मक होते, परंतु दोन्ही देशांनी रक्षा, ऊर्जा आणि व्यापार क्षेत्रात मजबूत भागीदारी कायम ठेवली. शीत युद्ध संपुष्टात आल्यानंतर भारताने अलीप्ततेचे धोरण सोडून बहुपक्षीय संबंध विकसित केले, तर रशियाने अमेरिकेच्या एकध्रुवीय वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी भारतासोबतची पारंपरिक मैत्री टिकवली. १९९३ मध्ये नवीन मैत्री संधि आणि २००० मध्ये सामरिक भागीदारी घोषित करून संबंध अधिक खोलवर नेले गेले. आजही हे संबंध BRICS आणि SCO सारख्या व्यासपीठांवर मजबूत आहेत.

- **सन १९९० नंतर भारतीय पंतप्रधानांची भूमिका:**

  १. **पी.व्ही. नरसिम्हा राव (१९९१-१९९६):** सन १९९४ च्या रशिया दौऱ्यात संरक्षण आणि व्यापारातील अडथळे दूर केले. ८३ कोटी डॉलर उधार आणि विमान दुरुस्ती संयुक्त कंपनीची घोषणा. आर्थिक सहयोग संधि; जियोस्टेशनरी उपग्रहांसाठी रॉकेट मदत.

  २. **एच. डी. देवेगौडा आणि आई. के. गुजराल (१९९६-१९९८):** प्रणव मुखर्जींनी रशियाशी हॉटलाइन आणि सहकार्य समझौते, सुखोई -३० लष्करी विमान खरेदी करार; पाकिस्तानला शस्त्रपुरवठा थांबवण्याचे आश्वासन. आणि

  ३. **अटल बिहारी वाजपेयी (१९९८-२००४):** परमाणु चाचण्यांनंतर रशियाने भारताला पाठिंबा दिला. सामरिक त्रिकोण (भारत-रशिया-चीन) प्रस्ताव, सामरिक समझोता; परमाणु रिएक्टर पुरवठा.

  ४. **मनमोहन सिंग (२००४-२०१४):** कुडनकुलम अणु प्रकल्प आणि ५ समझौते; २०११ दौऱ्यात रुपी-रुबल कर्ज सोडवणूक, तसेच आरोग्य आणि शिक्षण समझौते करार

  ५. **नरेंद्र मोदी (२०१४ – आजअखेर) :** वार्षिक शिखर परिषदा, ब्राम्होस क्षेपणास्त्र विस्तार, २०२४ पर्यंत १० पेक्षा अधिक दौऱ्यांत ऊर्जा आणि संरक्षण करार, भारत आणि रशिया यांच्यात लष्करी सहकार्य दृढ होत असून, जवळपास ५ अब्ज डॉलर किमतीच्या (हजार कोटी रुपये ४०सुमारे )'S-400' अत्याधुनिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या करारावर भर दिला जात आहे. या डीलमुळे अमेरिकेचा इशारा असतानाही, दोन्ही देशांनी संरक्षण

भागीदारी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा करार भारताच्या क्षमतेत मोठी भर टाकणारा ठरणार आहे, युक्रेन युद्धात भारताची तटस्थता आणि तेल खरेदी, व्यापार लक्ष्य ३० अब्ज डॉलर, संरक्षण आयातीत वाढ.

अशा प्रकारे भारताचे इतर देशांशी असणाऱ्या संबंधाबरोबर रशियाशी असणाऱ्या जुन्या घनिष्ठ संबंधात काही चढ-उतार होत असले तरी आजही रशिया भारत मैत्री सहकार्य वृध्दिगंत होत आहे.

**❖ शीत युद्धानंतर भारत - चीन संबंध:**

परराष्ट्र धोरणाचा तिसरा टप्पा म्हणजे शीतयुध्दोत्तर काळातील म्हणजे १९९१ ते आजपर्यंतच्या कालावधीतील आहे. हा शीतयुध्दोत्तर परराष्ट्र धोरणचा टप्पा अतिशय महत्वाचा आहे. याला पोस्ट नेहरूवियन पॉलिसी महणतात. या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या प्रक्रियेने वेग धरला आणि राष्ट्रा-राष्ट्रामध्ये आर्थिक एकीकरणाची प्रकिया वाढीस लागले.

भारत आणि चीनमधील संबंध हे इसवी सन पूर्व काळापासून प्रस्थापित झालेले आहेत. भारत आणि चीन या दोन राष्ट्रांना इतिहास काळापासुन जोडणारा महत्वाचा दुवा महणजे बौध्द धर्म होय. भारतातील ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारत आणि चीन दरम्यान वसलेल्या तिबेट प्रांतवर १९५० मध्ये चीनने लष्करी कारवाई करून आपले नियंत्रण प्रस्थापित केले. सीमावादाच्या प्रश्नावरून भारत आणि चीन दरम्यान १९६२ मध्ये युध्द झाले. चीनने भारताच्या हद्दीतील लडाखचा मोठा भु-भाग गिळंकृत केला. यामुळे भारत-चीन मधील राजनैतिक संबंध १९७०-७१ पर्यंत खंडित झाले ते १९७५ मध्ये पुन्हा राजनैतिक पातळीवर प्रस्थापित झाले. १९७९ मध्ये सोव्हिएत रशियाच्या अफगाणीस्थानमधील लष्करी हस्तक्षेपानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात नव्याने शीतयुध्दाला प्रारंभ झाला. अमेरिकेत रोनाल्ड रेगन यांची अध्यक्षपदावर निवड झाल्यानंतर अमेरिकेच्या दक्षिण आशियाविषयक धोरणात परिवर्तन घडून आले. अमेरिका, चीन आणि पाकिस्तान यांची एक नवीन युती आकारला आली. सन २००० मध्ये भारत-चीन संबंधाना ५० वर्षे पूर्ण झाल्यावर दोन्ही देशाकडून संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शीत युध्दोत्तर काळात भारत-चीन संबंधात शांतता आणि सहकार्याचे एक नवीन पर्व सुरू झाले. चीनचा भारतविषयक दृष्टिकोन बदलण्यास काही घडामोडी प्रामुख्याने जबाबदार होत्या त्या खालीलप्रमाणे:

**१. भारत-अमेरिका संबंधातील सुधारणा:-**

शीतयुध्दोत्तर काळात भारत आणि अमेरिका संबंधामध्ये घडुन आलेली सुधारणा चीनच्या भारतविषयीच्या दृष्टिकोनाला प्रभावित करणारी ठरली. या काळात भारत आणि अमेरिकेतील केवळ आर्थिक आणि व्यापारी नाही तर लष्करी संबंधही सुधारले. अमेरिकेकडून भारताला होणारी मदत ही चीनला प्रति संतुलित करणारी आहे. भारत व अमेरिकादरम्यान झालेल्या अणुइंधनाच्या पुरवठ्याविषयीचा ऐतिहासिक करार वाढत्या भारत व अमेरिका सहकार्याची साथ देणारा आहे. चीनचे भारत आणि अमेरिका या दोन्ही राष्ट्रासमवेत घनिष्ट आर्थिक आणि व्यापारी संबंध आहेत. भारत-चीन आणि अमेरिका यांचे दहशतवादासारख्या काही आंतरराष्ट्रीय मुद्द्यावर एकमत आहे. भारत आणि अमेरिकेमधील वाढते संबंध हा चीनसाठी चिंतेचा देखील विषय आहे.

**२. भारताची विभागीय महासत्तेची महत्वकांक्षा:-**

शीतयुध्दोत्तर काळात एक आर्थिक आणि लष्करी महासत्ता म्हणुन आशिया खंडात नावारूपाला येण्यासाठी भारताचे प्रयत्न गतिमान झाले. भारताने स्वीकालेले आर्थिक उदारीकरणाचे धोरण, परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी

उद्योग आणि व्यापार क्षेत्रात भारताचे सुधारलेले आर्थिक आणि व्यापारी संबंध आशियात आणि युरोपीय महासंघासारख्या व्यापार संघाबरोबर भारताचे झालेले आर्थिक आणि व्यापारी करार यातून भारताच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. लष्करी महासत्ता म्हणून उदयाला येण्याची महत्वाकांक्षा १९९८ मध्ये पूर्ण झाली. या वर्षी भारताने ०५ पाच अणुचाचण्या करून स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र घोषित केले. भारताच्या अण्वस्त्रधारी राष्ट्राच्या दर्जाला अमेरिकेसारख्या महासत्तांनी तत्वतः मान्यता दिलेली नसली, तरी देखील भारताकडे अण्वस्त्रे आणि अण्वस्त्र विकासाची क्षमता असण्याची जाणीव अमेरिकेला आहे. आशिया खंडात भारताचा वाढता प्रभाव रोखणे अवघड असल्याचे चीनला समजले आहे. आताचा भारत आणि १९६२ चा भारत यामध्ये मोठे अंतर असल्याची जाणीव चीनला झाली आहे.

**३. भारताचे अण्वस्त्र धोरण :-**

सन १९९८ मध्ये भारताने अणुपरीक्षण करून स्वतःला अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणुन घोषित केले. भारताच्या अण्वस्त्र विकासाचा उद्देश जगाला पटवून देताना भारताचे तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की भारताला सर्वाधिक धोका चीनकडून असुन, चीन हा भारताचा अहिल्या क्रमांकाचा रात्रु आहे. भारताच्या या भूमिकेमुळे भारत-चीन संबंधामध्ये तणाव निर्माण झाला. तथापि नंतर भारताचे तत्कालिन परराष्ट्रमंत्री जसवंतसिंग यांनी चीनला भेट देऊन अण्वस्त्र निर्मितीमागची भारताची भुमिका चीनला पटवून दिली. भारताचा अण्वस्त्र विकास कार्यक्रम हा केवळ आत्मसंरक्षणासाठी असून प्रथम हल्ला न करण्याच्या तत्वाशी भारत बांधील आहे. भारताच्या अणुकराराविषयीच्या धोरणामध्ये परिवर्तन आल्याचे स्पष्ट संकेत २००५ नंतरच्या अनेक घटनांमधून मिळतात. या परिवर्तनाची मुळे भारत आणि अमेरिकेतील ऐतिहासिक अणुशक्ती करारामध्ये आहेत.

**४. कारगील युध्दाप्रसंगी भारताने दाखवलेला संयमः-**

सन १९९९ मध्ये भारताच्या कारगील क्षेत्रात पाकिस्तान कडून घुसखोरी झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण होऊन युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली होती या प्रसंगी जर भारत आणि पाकिस्तानमध्ये प्रत्यक्ष युध्द झाले असते तर त्यातअण्वस्वाचा निश्चितच वापर झाला असता, असे युध्द टाळावे म्हणून भारताने दाखवलेला सयम अमेरिकेप्रमाणेच चीनच्या देखील कौतुकाचा विषय बनला. चीनच्या मनात भारताविषयी आदर यामुळे वाढला.

**५. पाकिस्तान तालिबान संबंध आणि चीनची डोकेदुखी :-**

सन १९९० च्या दशकात चीनच्या अंतर्गत सुरक्षेला दहशतवादाने आव्हान दिले. चीनच्या शीन शियांग प्रांतामध्ये मुस्लिम अल्पसंख्याकांनी फुटिरतावादी चळवळ सुरू केली. या फुटीरतावादी चळवळीत अफगानिस्तानमधून प्रशिक्षित झालेले अनेक मुजाहिदीन सामिल झाले. या फुटिरतावादी चळवळीला जेहादचे स्वरूप प्राप्त होऊन या क्षेत्रातला हिंसाचार वाढला. अफगानिस्तानमधील ज्या तालिबान शासनाच्या राजवटीमधून प्रशिक्षित दहशतवादी चीनमध्ये पाठविले जात होते, त्या तालिबान शासनाला पाकिस्तानचे असलेले समर्थन जगजाहीर होते. पाकिस्तानची गुप्तहेर संघटना ISI दक्षिण आशियात दहशतवाद पसरवण्यात कशा प्रकारची भूमिका पार पाडत आहे. याचीही कल्पना बीनला होती. या दहशतवादी कारवायांना समर्थन देणे पाकिस्तानने थांबवावे, यासाठी चीनकडून पाकिस्तानवर दबावही आला.

**६. दहशतवादाचा सामना भारत चीन सहकार्यातील नवे पर्व:**

दहशतवादाच्या समस्येने भारत आणि बीनला शीतयुष्दोत्तर काळात सहकार्याचे एक नवीन व्यासपीठ मिळवून दिले आहे. चीनच्या शीन-शियांग प्रांतातील तर भारताच्या जम्मू-काश्मिर क्षेत्रातील दहशतवादी हिंसाचाराने दोन्ही राष्ट्रांची अंतर्गत सुरक्षा धोक्यात आणली आहे. बीनने दहशतवादाचा सामना करण्यासाठी रशिया आणि तीन आशियाई राष्ट्रे याच्या प्रयत्नातून "शांघाय सहकार्य संघटना स्थापन केली असुन मध्य आशिया, रशिया आणि चीनमधील दहशतवादाचा सामना करण्यासाठी बहुपक्ष पातळीवर या संघनेच्या माध्यमातून प्रयत्न चालु आहेत. भारत या संघटनेचा सदस्य बनल्यास जम्मू-काश्मिरसह दक्षिण आशियातील दहशतवादी कारवाईवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. भारत आणि चीनने दहशतवादाचा सामना करण्यासाठी संयुक्त कार्यकारी गटाची स्थापना करण्याचे मान्य केले.

**७. काश्मिर प्रश्नावर चीनची बदललेली भुमिका:**

शीतयुद्धोत्तर काळात काश्मिरच्या प्रश्नावर चीनने अलिप्त धोरण स्विकारलेले दिसते. काश्मिरचा प्रश्न हा भारत आणि पाकिस्तानमधील व्दिपक्ष पातळीवरील प्रश्न असुन त्यामध्ये तिस-या राष्ट्राची मध्यस्थी नको या भारताच्या भुमिकेशी आता चीन सहमत आहे १९९६ मध्ये चीनचे तत्कालीन पंतप्रधान जियांग होमेन यांनी पाकिस्तानी सिनेट समोर बोलताना सुचवले की, काश्मिरचा प्रश्न भारत पाकिस्तान आर्थिक आणि व्यापारी सहकार्यामधला आडथळा बनायला नको. चीनच्या शीन-शियांग प्रांतातील दहशतवादी संघटनाचे आणि काश्मिरमधील दहशतवाही संघटनाचे परस्पर संबंध असून या दोन्ही प्रांतामधूनपाकिस्तानकडून प्रशिक्षित करण्यात आलेले दहशतवादी हिंसाचार घडवून आणत आहेत, जम्मु काश्मिर मधील हिंसाचार थांबावा आणि जम्मु काश्मिरचा प्रश्न भारत-पाकिस्तानने शांततेच्या मागनि वाटाघाटीने सोडवावा असे चीनचे मत आहे.

**८. सीमावादावर लवचिक धोरण:-**

गेल्या अनेक दशकापासुन भिजत पडलेल्या भारत-चीन सीमावादाप्रकरणी चीनने लवचीक भुमिका स्विकारली आहे. भारत आणि चीनमधील सीमावाद हा युध्द किंवा संघर्षाच्या माध्यामातुन सूटणारा नाही, याची चीनला जाणीव आहे. परिणामी हा प्रश्न परस्पर चर्चा आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवला जावा, या भारताच्या भुमिकेशी चीन सहमत आहे. भारत-चीन सीमावादाच्या प्रश्नांवर वाटाघाटीच्या माध्यमातून तोडगा काढला जावा, अशा प्रकारे भारत-चीन सीमावादावर चीनने भारताशी लवचीक धोरण स्वीकारले आहे कारण की, आशिया खंडातील या दोन बलाढय राष्ट्रांना परस्परांशी युध्द न करता सामोपचाराने समस्या सोडवाव्या लागतील, व्यापारी व आर्थिक संबंध अधिक दृढ करावे लागतील त्याशिवाय पर्याय नाही.

**९. सद्य स्थितीतील भारत-चीन संबंध :-**

भारत आणि चीन मधील संबंध गेल्या काही दिवसापासुन विकोपाला जात आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीनमधील दौ-याच्या निमित्ताने हे संबंध सुधारतील अशी आशा होती. परंतु ती फोल ठरली, भारत आणि व्हिएतनाम तसेच भारत आणि मंगोलिया यांच्यातील संबंध वाढणे चीनच्या डोळयात खुपणारे आहे. एकीकडे चीन भारताबरोबरचे संबंध दृढ होण्याची भाषा बोलत असतांना भारताला आणि अमेरिकेला धमकावतो आहे. दक्षिण चीन समुद्रातील बेटांच्या मालकीच्या वादात अमेरिकेने हस्तक्षेप केला असल्याने चीन नाराज आहे. भारताने अग्नी या अन्वस्ववाह क्षेपनास्वमालिकेतील अग्नी-चार व अग्मी पाच यांची डिसेवर व जानेवारीत यशस्वीरीत्या बाचणी घेण्यात आली अग्नी पाच हे साडेपाच हजार किलोमीटरपर्यंत मारा करू शकणारे आंतरखंडीय क्षेपनास्व आहे. या क्षेपनास्वाची चाचणी भारत गेली पाच सहा वर्षापासुन

करीत आहे, अशाप्रकारचे 'इंटरकॉन्टिनेंटल बॅलेस्टिक मिसाईल प्रक्षेपित करण्याची क्षमता फक्त सहा देशांची असुन त्यात भारताचा समावेश असणे, ही विशेष महत्वाची बाब आहे. मात्र या वागण्यावर आक्षेप घेत चीनने भारताला आण्विक व्यापारात सहजासहजी स्थान मिळू नये आणि त्यासाठी भारताला अनुपुरवठादार गटातून बाहेर ठेवायला हवे असे चानला वाटते. भारताच्या अण्वस्व धोरणाला विरोध करणारा चीन पाकिस्तानच्या आण्विक कार्यक्रमावाचत यत्किंचितही चिंता व्यक्त करत नाही. भारत आणि व्हिएतनाम मधील वाढते सहकार्य हे देखील चीनच्या नाराजीचे कारण आहे त्यामुळे भारताला कोंडीत पकडण्याची एकही संधी गीन सोडतांना दिसत नाही.

अशाप्रकारे भारत-चीन संबंधामध्ये आपणांस असे अनेक चढ-उतार दिसून येतात. दोन्ही देशामध्ये सीमाविवाद असला तरी आर्थिक, औद्योगिक व वाणिज्य या क्षेत्रात दोन्हीं देश आज सर्वाधिक जोडले गेलेले आहेत. चीनच्या महत्त्वाकांक्षा व भारताला शह देण्याच्या कुरघोडीना भारत समर्थपणे तोंड देत आशियातील शेजारी राष्ट्रांचे सहकार्य मिळवत आहे. ऑजही परराष्ट्र संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारणात चीन हा अविश्वासू व बेभरवशाचा सहकारी आहे.

### ❖ शीत युद्धानंतर भारत - पाकिस्तान संबंध:

सन १९९० नंतरही भारत - पाक संबंधात तणाव निर्माण झालेला आहे. भारताचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव ते नरेंद्र मोदी यांनी भारत संबंधात सुधारणा करण्याचे अनेक प्रयत्न केले, तरीही भारत-पाक संबंधात सुधारणा झालेली नाही. भारत-पाक संबंधात सुधारणा व्हावी म्हणून भारत सरकारच्या वतीने गुजराल सिद्धांत, लाहौर बस यात्रा फेब्रुवारी १९९९, आग्रा शिखर वार्ता (जुलै, २००१) करतारपुर कोरिडोअरवरील निर्बंध हटविणे (जुलै, २०१९), पंतप्रधान नरेंद्र मोदींची पाकिस्तानला भेट (२०१६) असे अनेक प्रयत्न झाले, तरीही पाकिस्तानकडून सकाराला प्रतिसाद न मिळाल्यामुळे भारत - पाक संबंधात कोणतीही सुधारणा झाली नाही. सन १९९० नंतर भारत-पाक संबंधात खालील थोडक्यात काही कारणामुळे सातत्याने तणाव वाढत गेले. सन १९९८ ची भारताची अणुचाचुणी, सन १९९९ चे कारगील युद्ध, पाक पुरस्कृत दहशतवाद, २९ सप्टेंबर २०१६ मधील सर्जिकल स्ट्राईक,८ नोव्हेंबर २०१६ रोजी भारतातील झालेली नोटा बंदी, सन २०१९ मध्ये भारताकडून झालेला एअर स्ट्राइक, कलम ३७० व ३५ A रद्द करण्याचे भारताचे धोरण, काश्मीर खोऱ्यातील दगडफेक करणाऱ्याविरुद्ध सक्तीचे धोरण, अलगाववाद्यांना जेलबंद करणे, हाफीज सईदला व अजहर मसुदला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित करण्याचे भारताचे प्रयत्न, पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय दहशतवादी राष्ट्र घोषित करावे यासाठीचे भारताचे प्रयत्न, अमेरिका व चीनसह अनेक राष्ट्रांकडून पाकिस्तानल होणारी मदत टाळण्याचे प्रयत्न, आंतरराष्ट्रीय स्थरावर पाकिस्तानची बदनामी करून त्याला एकाकी पाडव्याचे भारताचे प्रयत्न, एअर स्ट्राइकमधील विंग कमांडर हार्दिक अभिनंदन यांना भारतात परत आणण्याचे यशस्वी प्रयत्न, कुलभूषण जाधव प्रकरणात आंतरराष्ट्रीय न्यायालयात सुषमा स्वराज, हरिष साळवी यांनी मांडलेली भारताची बाजू इत्यादी. अशा प्रकारे भारताकडून ३७० व 35 A कलम रद्द करण्याच्या भुमिकेचा पाकिस्तानने नकारात्मक अर्थ काढून भारतासोबतच्या आर्थिक व्यापारी व सांस्कृतिक संबंधात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यामुळे भारत-पाक संबंधात तणाव वाढला आहे.

### ❖ शीत युद्धानंतर भारत - बांग्ला देश संबंध:

भारताच्या पूर्वेला असलेला बांगलादेश हा भारताचा एक महत्त्वाचा शेजारी देश आहे. भारताचे बांगलादेशशी ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक संबंध आहेत. भारत आणि बांगलादेश एकेकाळी एकच देश होता. बांगलादेश १९४७ मध्ये पूर्व पाकिस्तान म्हणून भारतापासून वेगळे झाले आणि **१९७१ मध्ये** स्वतंत्र राष्ट्र बनले. दोन्ही

देशांमधील द्विपक्षीय संबधात इतिहास, संस्कृती आणि भाषा यांचा वाटा आहे. भारत आणि बांग्लादेश वेळोवेळी संरक्षण सहकार्यासाठी संयुक्त प्रयत्नशील असतात. दोन्ही देशांमध्ये ऊर्जा आणि वीज क्षेत्रातही सहकार्य आहे.

भारत आणि बांगलादेश यांच्यात जमीन हस्तांतरणासह **२०१५ मध्ये** झालेला **भू-सीमा करार** हा एक महत्त्वाचा राजकीय संबंध प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. तथापि, बेकायदेशीर घुसखोरी हा दोन्ही देशांमधील वाद आणि चिंतेचा एक प्रमुख मुद्दा आहे, ज्यामुळे दोन्ही देशांच्या सुरक्षिततेसाठी आणि संरक्षणासाठी आव्हाने निर्माण झाली आहेत. तिस्ता नदीच्या पाणीवाटपाबाबतचा वाद सोडवण्यासाठी अद्याप कोणताही करार झालेला नाही, जो अजूनही सुरू आहे. भारत आणि बांगलादेशमधील संबंध मजबूत करण्यासाठी दोन्ही देशांना अनेक महत्त्वाचे उपक्रम हाती घेण्याची आवश्यकता आहे.

भारत आणि बांग्लादेश यांचे परराष्ट्र धोरणात्मक संबंध हे दक्षिण आशियातील सर्वात महत्त्वाच्या आणि संवेदनशील द्विपक्षीय संबंधांपैकी एक मानले जातात. भौगोलिक शेजारीपणा, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सांस्कृतिक साम्य आणि आर्थिक परस्परसंबंध यांमुळे या दोन देशांचे नाते केवळ औपचारिक कूटनीतीपुरते मर्यादित न राहता व्यापक आणि बहुआयामी स्वरूपाचे आहे. भारताचे **"Neighborhood First Policy"** आणि बांग्लादेशचे **"Friendship to all, malice to none"** हे परराष्ट्र धोरणातील मूलभूत तत्त्वे दोन्ही देशांमधील संबंधांची दिशा ठरवतात.

### १. भारत आणि बांग्लादेश परराष्ट्र धोरण व द्विपक्षीय संबंध: १९९१ ते १९९६

सन १९९१ ते १९९६ हा काळ भारत-बांग्लादेश संबंधांच्या इतिहासात एक संक्रमणाचा आणि पुनर्मूल्यांकनाचा टप्पा मानला जातो. या कालखंडात दोन्ही देशांमध्ये अंतर्गत राजकीय बदल घडून आले. तसेच त्याचा थेट परिणाम त्यांच्या परराष्ट्र धोरणावर व परस्पर संबंधांवर झाला. भारतात १९९१ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव यांच्या नेतृत्वाखाली आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया सुरू झाली, तर बांग्लादेशमध्ये सैन्यशाहीचा अंत होऊन लोकशाही शासनाची पुनर्स्थापना झाली. या पार्श्वभूमीवर दोन्ही देशांनी आपापल्या परराष्ट्र धोरणात व्यवहार्यतेला अधिक महत्त्व देण्यास सुरुवात केली. भारताशी संबंध ठेवताना सार्वभौमत्व, पाणीवाटप आणि सीमा प्रश्नांबाबत बांग्लादेश अधिक संवेदनशील होता. दुसरीकडे भारताने आपल्या **"शेजारी प्रथम"** दृष्टीकोनातून बांग्लादेशशी स्थिर आणि संघर्षविरहित संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला, कारण ईशान्य भारताच्या सुरक्षिततेसाठी बांग्लादेशचे भौगोलिक महत्त्व फार मोठे आहे. दरम्यान भारत आणि बांग्लादेश परराष्ट्र धोरण व द्विपक्षीय संबंधातील घटना पुढीलप्रमाणे :

**अ.** भारत-बांग्लादेश संबंधांमधील सर्वात महत्त्वाचा आणि वादग्रस्त मुद्दा **गंगा नदीच्या पाणीवाटपाचा** होता. फरक्का बॅराजमधून पाणी सोडण्याच्या प्रश्नावर दोन्ही देशांमध्ये तीव्र मतभेद होते. १९८८ नंतरचा अंतरिम करार संपुष्टात आल्यामुळे १९९१ ते १९९६ या काळात कोणताही दीर्घकालीन पाणीवाटप करार अस्तित्वात नव्हता. यामुळे बांग्लादेशमध्ये भारतविरोधी जनमत निर्माण झाले आणि द्विपक्षीय संबंधांवर त्याचा नकारात्मक परिणाम झाला. हा पाणीवाटपाचा प्रश्न या संपूर्ण कालखंडात भारत-बांग्लादेश संबंधांतील सर्वात मोठा अडथळा ठरला.

**आ.** सीमा आणि सुरक्षा प्रश्न हे देखील या काळात संवेदनशील होते. भारताला बांग्लादेशमधून ईशान्य भारतातील बंडखोर गटांना मदत मिळते, अशी चिंता होती. तसेच बेकायदेशीर स्थलांतर, तस्करी आणि सीमावर्ती गुन्ह्यांचे प्रश्न दोन्ही देशांसाठी डोकेदुखी ठरले. मात्र या काळात सुरक्षा सहकार्य फारसे प्रभावी नव्हते आणि परस्पर अविश्वास कायम होता. थेट संघर्ष टाळला गेला, पण घनिष्ठ सुरक्षा सहकार्याची पातळी कमीच राहिली.

**इ.** आर्थिक आणि व्यापारी संबंधांच्या बाबतीत १९९१–१९९६ हा काळ संथ प्रगतीचा मानला जातो. भारत आणि बांग्लादेश यांच्यात व्यापार सुरू होता, परंतु तो असमतोल होता. भारताकडून बांग्लादेशला होणारी निर्यात अधिक

आणि बांग्लादेशकडून भारतात जाणारी निर्यात तुलनेने कमी होती. त्यामुळे बांग्लादेशमध्ये व्यापार असमतोलाबाबत नाराजी दिसून येत होती. कनेक्टिव्हिटी, ऊर्जा सहकार्य आणि पायाभूत सुविधा प्रकल्प या काळात फारसे विकसित झाले नव्हते, जे पुढील काळातच वेगाने पुढे गेले.

**ई.** प्रादेशिक पातळीवर दोन्ही देश SAARC (दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना) मध्ये सक्रिय होते, मात्र भारत-पाकिस्तान तणावामुळे SAARC अपेक्षित यश मिळवू शकली नाही. याचा अप्रत्यक्ष परिणाम भारत-बांग्लादेश संबंधांवरही झाला, कारण प्रादेशिक सहकार्याची संधी मर्यादित राहिली.

एकूणच पाहता, १९९१ ते १९९६ या काळात भारत-बांग्लादेश संबंध **ना अत्यंत मैत्रीपूर्ण, ना उघडपणे संघर्ष**, तर संयमी आणि सावध स्वरूपाचे होते. या काळात काही मूलभूत प्रश्न सुटले नाहीत, विशेषतः पाणीवाटप आणि सुरक्षा सहकार्याबाबत. मात्र लोकशाही सरकारांमुळे संवादाची दारे उघडी राहिली आणि थेट संघर्ष टाळण्यात यश आले.

## २. भारत आणि बांग्लादेश परराष्ट्र धोरण व द्विपक्षीय संबंध: १९९१ ते १९९६

१९९६ ते १९९८ हा कालखंड भारत–बांग्लादेश संबंधांच्या इतिहासात नव्या विश्वासाचा आणि सकारात्मक वळणाचा काळ मानला जातो. या काळात दोन्ही देशांत राजकीय बदल घडून आले आणि त्याचा थेट परिणाम द्विपक्षीय संबंधांवर झाला. बांग्लादेशमध्ये १९९६ मध्ये अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना पंतप्रधान झाल्या, तर भारतातही या कालावधीत संयुक्त आघाडीचे सरकार सत्तेत आले. त्यानंतर तत्कालीन भारताचे परराष्ट्र मंत्री आय. के. गुजराल यांच्या गुजराल सिद्धांतानुसार शेजारील देशांशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न झाले. दरम्यान अवामी लीगचे भारताशी ऐतिहासिकदृष्ट्या मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे या काळात परस्पर विश्वास वाढण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. यावेळी सकारात्मक निर्णय पुढीलप्रमाणे :

**अ.** सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे १९९६ मधील गंगा नदी पाणीवाटप करार. हा ३० वर्षांचा दीर्घकालीन करार भारत आणि बांग्लादेश यांच्यातील दीर्घकाळ चाललेल्या फरक्का पाणीवाटप विवादावर तोडगा काढणारा ठरला. या करारामुळे बांग्लादेशमध्ये भारताबद्दल निर्माण झालेला असंतोष मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि द्विपक्षीय संबंधांमध्ये नव्या सहकार्याची सुरुवात झाली. पाणीवाटपाचा प्रश्न सुटल्यामुळे दोन्ही देशांमध्ये राजकीय विश्वास आणि कूटनीतिक स्थैर्य वाढले.

**आ.** १९९६–१९९८ या काळात **सुरक्षा आणि सीमा सहकार्यालाही गती मिळाली**. बांग्लादेशने आपल्या भूमीचा वापर भारतविरोधी बंडखोर गटांकडून होऊ न देण्याची भूमिका स्पष्ट केली. यामुळे ईशान्य भारताच्या सुरक्षेबाबत भारताच्या चिंता कमी झाल्या. सीमा व्यवस्थापन, तस्करी आणि बेकायदेशीर हालचाली रोखण्यासाठी दोन्ही देशांमधील संवाद वाढला, जरी सुरक्षा सहकार्य अजूनही प्रारंभिक टप्प्यात होते.

**इ.** **आर्थिक आणि व्यापारी संबंधांच्या** बाबतीत या काळात हळूहळू सुधारणा दिसून आली. भारत आणि बांग्लादेश यांच्यात व्यापार वाढण्यास सुरुवात झाली, जरी व्यापार असमतोलाचा प्रश्न पूर्णतः सुटला नव्हता. कनेक्टिव्हिटी, वाहतूक आणि ऊर्जा सहकार्य यावर चर्चा सुरू झाली, ज्याचे ठोस परिणाम पुढील दशकात दिसून आले. या काळात द्विपक्षीय संबंधांचा आर्थिक पाया अधिक मजबूत होऊ लागला.

**ई.** राजकीय आणि राजनैतिक पातळीवर दोन्ही देशांमध्ये **उच्चस्तरीय भेटी आणि संवाद यंत्रणा** सक्रिय झाल्या. परस्पर संबंध केवळ औपचारिक न राहता विश्वासाधारित होऊ लागले. बांग्लादेशने भारताशी सहकार्य वाढवताना स्वतःचे

सार्वभौम हित जपण्याचा प्रयत्न केला, तर भारताने बांग्लादेशला एक महत्त्वाचा प्रादेशिक भागीदार म्हणून पाहण्यास सुरुवात केली.

**उ.** प्रादेशिक स्तरावर दोन्ही देश **SAARC** च्या चौकटीत सहकार्य करत होते. जरी SAARC वर भारत–पाकिस्तान तणावाचा परिणाम होत असला, तरी भारत–बांग्लादेश द्विपक्षीय संबंध तुलनेने अधिक स्थिर आणि सकारात्मक राहिले. यामुळे दक्षिण आशियातील प्रादेशिक स्थैर्यासाठी या संबंधांचे महत्त्व अधोरेखित झाले.

**३. २१व्या शतकातील भारत-बांगलादेश संबंध :-**

२१व्या शतकाच्या प्रारंभी दोन्ही देशांतील संबंध अधिक विकसित करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण पाऊले उचलली गेली. २००० साली भारतीय परराष्ट्र मंत्र्यानी ढाका यात्रा करत संबंध सुधारण्यावर भर दिला. दोन्ही देशांत त्रिपुरा (आंगरतळा ते ढाका दरम्यान) बस सेवा सुरु करण्याचे ठरले. दरम्यान दोन्ही देशांनी परस्पर भूप्रदेशांचे आदान-प्रदान करण्याचा निर्णय घेतला, सीमा निश्चितीबाबत चर्चा झाली. तसेच भारताने बांगलादेशला दळण-वळण सुविधांच्या विकासासाठी ४०० कोटींचे कर्ज देण्याचे मान्य केले. बांगलोदशच्या भूमीचा वापर भारतविरोधी दहशतवादीकारवायांसाठी होणार नाही, तसेच दोन्ही देशांच्या सुरक्षा दलांत सीमेवरील गुन्हेगारी रोखण्यासाठी नियमित बैठका घेण्याचे ठरवण्यात आले. सन २००१ मध्ये रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करत द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी प्रत्यक्षात रेल्वे व्यापार सुरू झाला. दरम्यान नवी दिल्ली येथील बैठकीत दोन्ही देशांत व्हिसा सुविधेबाबत चर्चा झाली. दोन्ही देशांतील नागरिकांना पासपोर्ट मिळण्याबाबत नवीन नियमावली करण्यात आली.

सन २००२ मध्ये बांगलादेशमधील सत्तांतरानंतर तेथील हिंदू धर्मीयांच्या विरोधात अत्याचाराच्या घटना सुरू झाल्या. या पार्श्वभूमीवर भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. ब्रजेश मिश्रा यांनी बांगलादेशला भेट देऊन बांगलादेशमधील हिंदू धर्मियांच्या हत्येबाबत चिंता व्यक्त करत भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताबाबत बोलणी केली. बांगलादेशी नागरिकांनी हिंदू धर्मीयांच्याबाबतीत भेदभाव न करण्याचे आव्हान केले. तसेच दरम्यान काठमांडू येथे झालेल्या सार्क शिखर संमेलनात दोन्ही देशाच्या नेत्यांनी परस्परांत आर्थिक व व्यापारी सहकार्य वाढवण्यासंदर्भात धोरणाचा पुनरुच्चार करण्यात आला. सन २००२ मध्ये भारतातील गुजरात या राज्यात झालेल्या धार्मिक दंगलीनंतर बांगलादेशने या काळात चीनसोबत संबंध सुधारण्याबरोबर भारतावर दबाव टाकण्याचे धोरण अवलंबले. या बांगलादेशी धोरणांमुळे दोन्ही देशांतील अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

सन २००३ नंतर भारत-बांगलादेश संबंधातील तणावाचे धोरण निवाळण्याचा प्रयत्न झाला. २०११ मध्ये दोन्ही देशातील जुना सीमा विवाद समाप्त करण्याचा करार झाला व २०१५ ला त्याची अंमलबजावणी झाली. २०१५ ला नरेंद्र मोदीनी बांगला देश दौराच्या वेळी २२ करारावर सह्या केल्या. ज्यात ऊर्जा क्षेत्र महत्त्वपूर्ण होते. २०१७ ला शेख हसीना व नरेंद्र मोदी यांच्यात संयुक्त सैन्य अभ्यास व प्रशिक्षण करार केला. संरक्षण खरेदीला ५०० दशलक्ष डॉलर देण्यात आले, तसेच भारत-बांगलादेशी विद्यार्थीना शिक्षणासाठी स्कॉलरशीप देण्याचे ठरवले. २०१८ मध्ये भारत व बांगला देशमध्ये १० अब्ज डॉलर्स व्यापाराची शक्यता आहे. याप्रकारे भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध सध्या सुधारत आहे.

❖ **शीत युद्धानंतर भारत - श्रीलंका संबंध:**

शीत युद्धानंतर भारत आणि श्रीलंकेच्या परराष्ट्र धोरणांत महत्त्वपूर्ण बदल झाले, ज्यात शेजारील देशांसोबतची जवळीक, सुरक्षा आणि आर्थिक सहकार्यावर भर देण्यात आला. भारताने शीत युद्धानंतर 'नेबरहुड फर्स्ट' आणि 'सागर' धोरणे स्वीकारली, ज्यामुळे श्रीलंका हे भू राजकीय बफर म्हणून महत्त्वाचे ठरले. चिनी प्रभावाविरुद्ध (जसे हंबनटोटा बंदर) भारताने

ऊर्जा आणि संरक्षण करार करून एक मजबूत धोरण निश्चित केले. श्रीलंकाने भारताशी जवळीक साधताना त्याच्या भूभागाचा वापर भारतविरोधी हेतूने होणार नाही ही खात्री दिली.

शीतयुद्धानंतर (१९९१ नंतर) भारत-श्रीलंका व्यापारी संबंध मजबूत झाले असून, मुक्त व्यापार करारामुळे द्विपक्षीय व्यापार वाढला. भारत श्रीलंकेचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार ठरला आहे. मुक्त व्यापार करार १९९८ च्या भारत-श्रीलंका मुक्त व्यापार कराराने (ISFTA) व्यापारात क्रांती घडवली. २००० पासून प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक १.७ अब्ज डॉलर झाली. लिट्टे युद्ध संपल्यानंतर (२००९) श्रीलंकाने भारताशी रक्षा, नौसेना अभ्यास (स्लिनेक्स) आणि ग्रिड इंटरकनेक्शनवर भर दिला. दरम्यान भारत व श्रीलंका यांच्यामध्ये ऊर्जा आणि विकास प्रकल्पात वाढ झाली. तसेच श्रीलंका आर्थिक संकटात (२०२२) भारताने ४ अब्ज डॉलर मदत दिली; त्यातूनच ओमानथाई रेल्वे, साम्पूर सौर ऊर्जा (२५ मेगावॅट), पेट्रोलियम पाइपलाइन, त्रिंकोमाली तेल टँक, नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प सुरू झाले. ही मदत श्रीलंकेच्या विदेशी मुद्रा भंडाराच्या तुटवड्यामुळे आणि दिवाळखोरीच्या धोक्यामुळे आवश्यक ठरली. प्रमुख मदतीमध्ये ऋण सुविधा: १४०० दशलक्ष डॉलरपेक्षा जास्त, ज्यात ५०० दशलक्ष डॉलर ईंधन आयातसाठी आणि १००० दशलक्ष डॉलर अन्न, औषधे व आवश्यक वस्तूंसाठी. मुद्रा विनिमय: सार्क अंतर्गत ४०० दशलक्ष डॉलर क्रेडिट लाइन आणि एसीयू भरणे स्थगित. तसेच भारताने IMF ला श्रीलंका मदतीसाठी पाठिंबा दिला. परिणामी श्रीलंकेचे राष्ट्रपति रणिल विक्रमसिंघे व इतर नेत्यांनी भारताच्या या मदतीचे कौतुक केले, ज्यामुळे रक्तरंजित अस्थिरता टळली. व्यापार आकडेवारी २०२३-२४ मध्ये द्विपक्षीय व्यापार ५.५ अब्ज डॉलर झाला, ज्यात भारताचे निर्यात ४.१ अब्ज आणि श्रीलंकेचे १.४ अब्ज होते. श्रीलंकेच्या ६०% पेक्षा जास्त निर्यात भारतात येतात. या मदतीमुळे तमिळ मुद्‌द्यावर संवाद सुधारला आणि चीनच्या प्रभावावर नियंत्रण आले. आर्थिक व सांस्कृतिक फायाद्यांमध्ये UPI स्वीकार, रुपे व्यापार निपटान आणि सांस्कृतिक प्रकल्प (जसे सीता एलिया मंदिर) यामुळे लोकांमधील जवळीक वाढली. शीतयुद्धानंतर भारत-श्रीलंका संरक्षणात लक्षणीय प्रगती झाली असून, संयुक्त अभ्यास, वार्ता आणि करारांद्वारे द्विपक्षीय संबंध मजबूत झाले. भारत आणि श्रीलंका या देशामध्ये एक प्रमुख संयुक्त लष्करी द्विपक्षीय परीसंवाद -२०२५ (११वे पर्व) बेलगावी येथे आयोजित केले, ज्यात राजपूत व गजाबा रेजिमेंटने आतंकवादविरोधी, ड्रोन हल्ले प्रतिबंध, हेलिबोर्न ऑपरेशन, शोध व घेराबंदी या प्रमुख विषयावर चर्चा करण्यात आली. या चर्चेतून परस्पर संबंध व विश्वास वाढविन्यास मदत झाली. तसेच तंत्रज्ञान व प्रशिक्षण क्षेत्रामध्ये कोर्स एक्सचेंज, मानवीय सहाय्य व आपत्ती व्यवस्थापन आणि हिंद महासागर स्थिरतेसाठी चीनविरोधी भूमिका अशा अनेक घटना भारत श्रीलंका संबंध वाढीस मदत करणाऱ्या ठरल्या .

शीतयुध्दोत्तर काळ हा भारतीय परराष्ट्र धोरणाच्या बदलत्या विविध देशांशी संबंधाची पूर्नमांडणीचा कालावधी होता. भारतीय परराष्ट्र धोरण शीतयुध्दात काही प्रमाणात रशियाकडे झुकलेले असले तरी अलिप्ततावादी चळवळीच्या माध्यमातून स्वतंत्र अस्तित्त्वाची लढाई भारताने चालू ठेवली. शीतयुध्दोत्तर जागतिक राजकारणात जे बदल झाले, त्याचा परिणाम भारतीय परराष्ट्र धोरणावरही पडला व रशियाचा नाहीतर अमेरिका व शेजारील राष्ट्रांशी स्वःहित व जागतिक शांततेच्यादृष्टीनेपरराष्ट्र धोरणाची मांडणी केली आहे.

★ ★ ★

# घटक क्र. ४

## भारतीय राष्ट्रीय सुरक्षेसमोरील सद्यकालीन आव्हाने

**प्रस्तावना :**

भारतीय राष्ट्रीय सुरक्षा समोर अनेक सद्यकालीन आव्हाने उभी आहेत, जी भू-राजकीय, अंतर्गत आणि प्रौद्योगिकी बदलांमुळे वाढत आहेत. ही आव्हाने सीमावर्ती धोके, दहशतवाद, सायबर हल्ले आणि आर्थिक असुरक्षा यांचा समावेश करतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताचे परराष्ट्र धोरण हे शांततावादी आणि परस्पर सहकार्याचे आहे. भारताने कधीही कोणत्या राष्ट्रावर आक्रमण केले नाही. भारताने शेजारी राष्ट्रांच्या सार्वभौमत्त्वाचा नेहमीच आदर करत मैत्रीपूर्ण संबंध जोपासले आहेत. भारताचा अणुऊर्जेचा कार्यक्रम ही उर्जानिर्मितीसाठी आहे. भारत आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन नेहमीच करतो. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपासून भारताने आपले सक्रिय योगदान दिले आहे. आजही जगात भारतातील लोकशाही व्यवस्थेचे कुतूहल आहे. आपला देश बहुविविधतेने नटलेला आहे. ही विविधता आपली शक्ती आहे. परंतु आपली शेजारी राष्ट्र ज्यांना भारताची महासत्ता देश म्हणून होत असणारी भविष्यातील वाटचाल रोखायची आहे. आपले पारंपारिक शत्रु राष्ट्र पाकिस्तान भारतासमोर सर्व प्रकारचे अडथळे आणण्यात व्यस्त असतो. चीन व पाकिस्तानची सामरिक भागीदारी काश्मीर प्रश्न पाकपुरस्कृत दहशतवाद, 'नक्षलवाद' ही आव्हाने आपल्या सुरक्षा व्यवस्थेसमोर आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या सुरुवातीच्या काळात पं. नेहरू यांच्या राजवटीत कृषी व औद्योगिक विकासाला तसेच विज्ञान-तंत्रज्ञान, ग्रामविकास, वाहतूक, शिक्षण आणि ऊर्जा निर्मिती क्षेत्रांना नियोजनाच्या माध्यमातून वेगाने सुरुवात केली गेली.

➢ **सीमावर्ती आणि बाह्य धोके**:

१९६२ सालच्या भारत-चीन युध्दानंतर भारतामध्ये इतर क्षेत्रांबरोबर संरक्षण क्षेत्राच्या सक्षमतेबाबत वेगवान उपाययोजना सुरू झाल्या. १९६५ साली भारताने पाकिस्तानचा थेट युद्धभूमीवर पराभव केला. १९७१ सालच्या बांगलादेश मुक्ती संग्रामात भारतीय लष्कराने पाकिस्तानला चारीमुंड्या चीत करत पाकिस्तानी लष्कराला शरणागती स्वीकारायला भाग पाडले. यानंतर पाकिस्तानने निरनिराळ्या मार्गाने भारतासमोर धोके निर्माण केला. उदा. दहशतवादी हल्ले, घुसखोरी, १९९९ सालच्या कारगिल युध्दातही भारताने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत विजय संपादन केला. भारताच्या संरक्षण क्षेत्रातील परिपूर्ण विकासामध्ये काही प्रमाणात मर्यादा असल्यातरी भारताने त्या दिशेने टप्प्याटप्प्याने वाटचाल सुरू केली. आज भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा दलामध्ये पुढील यंत्रणा कार्यरत आहेत. (१) भारतीय भूदल, (२) भारतीय नौदल, (३) भारतीय हवाईदल, (४) निमलष्करी दल, (५) पोलीस यंत्रणा, (६) गुप्तचर यंत्रणा. जगामध्ये आकार व बळाच्या दृष्टीने भारताची लष्करी व्यवस्था चौथ्या क्रमांकाची आहे.

भारताला पाकिस्तान आणि चीनसोबतच्या सीमांवर सतत तणावाचा सामना करावा लागतो. जम्मू-कश्मीरमध्ये ड्रोनद्वारे शस्त्रास्त्रांची तस्करी आणि सीमापार दहशतवाद हे प्रमुख प्रश्न आहेत, ज्यामुळे सुरक्षा दलांना सतत सतर्क राहावे लागते. लडाख आणि डोकलामसारख्या घटनांमुळे हायब्रिड युद्ध आणि ग्रे-झोन रणनीतींनी आव्हान वाढवले आहे, ज्यात पारंपरिक युद्धाऐवजी सायबर आणि प्रॉक्सी हल्ले होतात. चीनच्या वाढत्या लष्करी क्षमतांमुळे पूर्वेकडील सीमेवर तणाव आहे, तर पाकिस्तानकडून प्रायोजित दहशतवाद पश्चिम सीमेला धोका देतो. सन २०२६ पर्यंत नक्सलवाद संपवण्याचे सरकारचे ध्येय असले तरी, हे आव्हान कायम आहे.

➢ **भारतासमोरील नक्षलवाद आणि दहशतवादाचे आव्हान :-**

दहशतवाद हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचे सर्वात मोठे आव्हान आहे. आज जगातील विकसित, विकसनशील व अविकसित अशी सर्व प्रकारची राष्ट्र दहशतवादाला तोंड देत आहेत. भारत हा ही एक दहशतवादाची झळ बसलेला देश आहे. दक्षिण आशियातील भारताचे भौगोलिक स्थान आणि भारताची बहुआयामी धार्मिक, भाषिक, वांशिक आणि सामाजिक ओळख या बाबी ही काही प्रमाणात दहशतवादाला बळ देतात. स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच भारताला पाकिस्तान हे शत्रू राष्ट्र लाभलेले आहे. काश्मीर प्रश्नांवरून पाकिस्तानने अनेकवेळा भारतात दहशती कारवाया केलेल्या आहेत. पुलवामा (२०१९) आणि मुंबई (२००८) सारख्या हल्ल्यांनी त्याची तीव्रता दाखवली. सीमापारून होणारे हल्ले आणि अंतर्गत नेटवर्क्समुळे हे आव्हान वाढले आहे. नक्षलवाद हे आंतरिक सुरक्षेचा प्रमुख धोका आहे. छत्तीसगढ, ओडिशा आणि महाराष्ट्रातील भागांत नक्षल हे विकास प्रकल्पांना निशाना बनवतात आणि पायाभूत सुविधा नष्ट करतात. सरकारने २०२६ पर्यंत त्याला मिटवण्याचा निर्धार केला असला तरी, स्थानिक असंतोष आणि शस्त्र पुरवठा हे अडथळे आहेत.

पाकिस्तानस्थित पुढील दहशतवादी संघटना भारतामध्ये दहशतवादी कारवाया चालू ठेवण्यासाठी सक्रिय आहेत. (१) लष्कर-ए-तोयबा, (२) जैश-ए-मोहम्मद, (३) तेहरिक-ए-तालिबान, (४) हिजबूला मुजाहिद्दीन, (५) अल-कायदा. सध्या इराक व सीरियामध्ये हिंसाचार घडवणारी इसिस (Islamic State of Iraq and Syria) या संघटनेचाही भारताला धोका आहे. इसिस या क्रूर व निर्दयी दहशतवादी संघटनेने ईस्लामी देशांबरोबर युरोपीयन देशांतही हल्ले घडवून आणले आहेत. भारतातील महाराष्ट्र, केरळ, उत्तरप्रदेश या राज्यातील अनेक युवक इसिसकडे आकर्षित झाल्याचे तपास यंत्रणांनी उघड केली आहे. देशाच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची १९८४ साली खलिस्तानी दहशतवाद्यांनी हत्या केली. तसेच मे १९९१ साली माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची श्रीलंकेतील तामिळ दहशतवादी गट LTTE ने हत्या केली. ही दोन दुर्दैवी प्रकरणे भारतासमोरील दहशतवादाच्या आव्हानांचा आवाका स्पष्ट करतात. १३ डिसेंबर २००१ रोजी पाक दहशतवाद्यांनी भारताच्या संसदेवर हल्ला घडवून आणला. यापूर्वी १९९३ साली मुंबईत शेकडो निष्पापांचे प्राण घेणाऱ्या बॉम्ब स्फोटाची मालिका घडवून आली. सामान्य जनतेच्या मनात भीती व अस्वस्थत निर्मितीसाठी भारतीय रेल्वे, सार्वजनिक बाजारपेठा, शासकीय कार्यालये, प्रार्थना स्थळे व इत गर्दीच्या ठिकाणांना दहशतवादी हिंसाचारासाठी लक्ष्य करतात. यासाठी सदैव दक्ष राहून राष्ट्रीय सुरक्ष भक्कम करणे व गुप्तचर यंत्रणाचे जाळे सक्रिय ठेवणे या बाबी अत्यावश्यक आहेत. सध्या भारताने दहशतवादाविरोधात "शून्य सहानुभूती" या कठोर भूमिकेचा स्वीकार केला आहे. तसेच भारताने दहशतवादाला तोंड देण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या आहेत.

**१. देशांतर्गत सामाजिक व सांस्कृतिक उपाय :-** भारतात धर्मनिरपेक्षता व परधर्म, सहिष्णूता या तत्त्वांचा स्वीकार करत सर्वांमध्ये प्रेम, जिव्हाळा व बंधुभाव वाढावा. यासाठी सर्व स्तरावर विशेष काळजी घेतली जाते. दारिद्रय, गरीबी व बेरोजगारी या सामाजिक समस्या ही तरुणांना विचलित करतात. यासाठी शासनस्तरावरून विविध प्रोत्साहनपर योजना सुरू आहेत.

**२. राजकीय उपाययोजना :-** भारतात केंद्र सरकारने आपल्या मित्र राष्ट्रांशी यामध्ये रशिया, इस्रायल, अफगाणिस्तान, जर्मनी, फ्रान्स, बांगलादेश या राष्ट्रांसोबत आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादाचे निर्मूलन सामूहिकरित्या करार केले आहेत. या अंतर्गत दोन राष्ट्रे दहशतवादाला रोखण्यासाठी परस्पर माहिती व तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करतात. भारतातील युवावर्ग वाममार्गाला लागू नये यासाठी उच्चशिक्षण व रोजगाराची संधी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी देशांतर्गत दहशतवाद-फुटीरतावादाला आळा घालण्यासाठी आसाम, मिझोराम, पंजाब या राज्यांशी शांततेचे करार केले.

**३. सुरक्षा यंत्रणाची बळकटी :-** सध्या भारतीय लष्कर, नौदल, वायुदल सीमापार दशहतवादाला घुसखोरीला समर्थपणे तोंड देत आहे. भारतीय लष्कराने अनेक दहशतवादी घुसखोर हल्ले निष्प्रभ ठरवलेत. देशांतर्गत फुटीरतावादी संघटनाच्या हिंसाचाराला सामोरे जाण्याचे कार्य निमलष्करी दले करतात. उदा. CRPF, CISF. ईशान्येकडील राज्यातील व काश्मीरमधील हिंसाचाराला भारतीय सुरक्षादलांनी आजपर्यंत प्राणांचे बलिदान देत तोंड दिले आहे. आपल्या सुरक्षादलांकडे अजूनही अमेरिका, ब्रिटन, इस्रायल या राष्ट्रांकडे असणारे प्रभावी व अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही.

**४. गुप्तचर यंत्रणा :-** दहशतवादी गट व संघटना आपली कट-कारस्थाने गुन्हेगारी कृत्ये गुप्तपणे चोरट्या मार्गाने करत असतात. भारतीय गुप्तहेर यंत्रणा जगभरात सक्रीय आहे. रॉ ही गुप्तहेर संघटना संपूर्ण जगभरात भारताच्या सुरक्षेसाठी कार्यरत आहे. तर आयबी (IB) देशांतर्गत गुप्तहेर यंत्रणाचे कार्य करते. आपल्या गुप्तचर यंत्रणा सक्षमपणे यशस्वी झाल्यास दहशतवादी कट हाणून पाडता येतात. भारतीय लष्कराच्याही स्वतंत्र गुप्तहेर यंत्रणा कार्यरत आहेत.

**५. राष्ट्रीय तपास संस्था (NIA) :-** २००८ सालच्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने दहशतवादी हल्ल्यांचा स्वतंत्र तपास व्हावा यासाठी राष्ट्रीय तपास संस्था स्थापन केली. NIA मार्फत आज दहशतवादी संघटना व त्यांच्याशी निगडीत सर्व घटकांचा विशेष तपास सुरू केला आहे. NIA च्या माध्यमातून आपण दहशतवादाला पूर्वतयारीने तोंड देवू शकतो. NIA ने दहशतवादी संघटनाची आर्थिक रसद तोडण्याची योजना राबवली आहे. यामध्ये NIA यशस्वी ठरली आहे.

**६. राष्ट्रीय सुरक्षा दल (NSG) :-** १९८४ पासून भारतीय लष्कराची विशेष प्रशिक्षित शाखा म्हणजे NSG. कोणत्याही स्वरूपाच्या दहशतवादी हल्ल्याला चोख व सडेतोड प्रत्युत्तर देण्याची तयारी NSG ची असते. विशेष करून दहशतवादी हल्ले हाणून पाडण्यासाठीच NSG कार्यरत आहेत.

**७. विशेष अभियान :-**भारतीय लष्कराने सीमापार पाकव्याप्त काश्मीरमधील व ईशान्येकडील सीमावर्ती अशांत राज्यातील फुटीर संघटनांना अद्दल घडवण्यासाठी 'लक्ष्यभेदी अभियान' Surgical Strike यासारखी यशस्वी योजना राबवली आहे. उदा. म्यानमारमधील भारताची लष्करी कारवाई.

**८. सुरक्षा यंत्रणाचा समन्वय :-**लष्कर आणि पोलीस या दोन्ही यंत्रणा आज जम्मू आणि काश्मीरमध्ये संयुक्तपणे अभियान राबवत आहेत. या संयुक्त प्रयत्नांना उत्तम यश लाभलेले आहे. भारतातील नक्षलवादी हिंसाचाराला तोंड देण्यासाठी निमलष्करी दल व पोलीस छत्तीसगड, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व झारखंड या राज्यांत एकत्रित काम करत आहेत. उदा. उ-६० पथक कोब्रा बटालियन. I

**९. भारतात दहशतवादी कृत्यांना आळा घालण्यासाठी कायदे :-** अ) अंतर्गत सुरक्षा कायदा-१९७१, ब) राष्ट्रीय सुरक्षा कायदा-१९८०, दहशतवाद व अशांततावादी कृतीविरोधी प्रतिबंधात्मक-१९८७, स्थानबध्दता कायदा-१९८७, दहशतवाद प्रतिबंधक अध्यादेश - २००१, दहशतवाद प्रतिबंधक कायदा - २००२.

➢ **सायबर सुरक्षा आव्हाने :**

भारत सायबर हल्ल्यांच्या बाबतीत जगातील महत्वपूर्ण पाच देशांपैकी एक आहे. CERT-In च्या अहवालानुसार, दुष्प्रचार, डेटा चोरी आणि क्रिटिकल इन्फ्रास्ट्रक्चरवर हल्ले वाढले आहेत. रशिया-युक्रेन युद्धासारख्या

घटनांमुळे हायब्रिड थ्रेट्स वाढले आहेत. चीन आणि पाकिस्तानकडून सायबर घुसपेठ होत असून, निवडणुका आणि सामाजिक एकता धोक्यात आहे. डिफेन्स सायबर एजन्सी (DCA) स्थापन झाली असली तरी, क्षमता वाढवणे गरजेचे आहे.

सायबर सुरक्षा ही आजच्या डिजिटल युगातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. ही क्षेत्रातील आव्हाने आणि उपाययोजना समजून घेणे प्रत्येक व्यक्ती, संस्था आणि सरकारसाठी आवश्यक आहे. सायबर सुरक्षा आव्हानांमध्ये सायबर हल्ल्यांचा वेगवान वाढ, नवीन तंत्रज्ञानांचा गैरवापर आणि जागतिक स्तरावर होणारे धोके यांचा समावेश होतो. २०२६ पर्यंत AI-आधारित हल्ले, डीपफेक आणि क्वांटम कम्प्युटिंगमुळे धोके अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. भारतात डेटा उल्लंघन आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले असून, हे युद्धापेक्षा मोठे घातक ठरत आहेत. सायबर हल्ल्यांमध्ये रॅन्समवेअर, फिशिंग, डीपफेक, DDoS हल्ले आणि AI-संचालित स्वयंचलित हल्ले प्रमुख आहेत. रॅन्समवेअरमध्ये हॅकर्स डेटा लॉक करून खंडणी मागतात, ज्यामुळे संस्थांना मोठे नुकसान होते. डीपफेक तंत्रज्ञानामुळे सोशल इंजिनीअरिंग हल्ले सोपे झाले असून, खोट्या व्हिडिओ किंवा आवाजाने विश्वासघात केला जातो. भारतासारख्या डिजिटल अर्थव्यवस्थेत डेटा उल्लंघनाची घटना वाढली आहे. सन २०२३ मध्ये भारतीयांच्या वैयक्तिक डेटाचे डार्क वेबवर विक्री झाल्याचे उघड झाले, ज्यामुळे गोपनीयता धोक्यात आली.

भू-राजकीय तणावामुळे हे हल्ले वाढत आहेत. क्वांटम कम्प्युटिंगमुळे पारंपरिक एन्क्रिप्शन व्यर्थ होईल, ज्यामुळे संवेदनशील डेटा असुरक्षित होईल. भारतात माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि राष्ट्रीय सायबर सुरक्षा धोरण २०१३ अस्तित्वात असले तरी अंमलबजावणी कमकुवत आहे. सायबर गुन्हे जसे हॅकिंग, ऑनलाइन फसवणूक आणि सायबर दहशतवाद वाढत आहेत. जनजागृतीचा अभाव आणि डिजिटल साक्षरतेची कमतरता ही प्रमुख समस्या आहेत. डार्क वेबवर डेटा विक्री आणि AI-आधारित हल्ल्यांमुळे वैयक्तिक आणि सरकारी डेटा धोक्यात आहे. कोविडनंतर ऑनलाइन व्यवहार वाढल्याने फिशिंग आणि रॅन्समवेअर हल्ले दुप्पट झाले.

- **सायबर सुरक्षेचे उपाययोजना:**

सायबर सुरक्षेसाठी तांत्रिक, कायदेशीर आणि सामाजिक उपायांचा समन्वय आवश्यक आहे. बहुस्तरीय संरक्षण पद्धती (Defense-in-Depth) अवलंबणे हे मूलभूत तत्त्व आहे. **तांत्रिक उपायामध्ये** एन्क्रिप्शन आणि फायरवॉल: संवेदनशील डेटा एन्क्रिप्ट करा आणि फायरवॉल, IDS/IPS सिस्टम वापरा. AI आणि मशीन लर्निंग: AI-आधारित धोका शोध साधने हल्ल्यांचा प्रतिकार करतील. मल्टि-फॅक्टर ऑथेंटिकेशन (MFA): पासवर्ड व्यतिरिक्त बायोमेट्रिक किंवा OTP वापरा. नियमित अपडेट्स आणि पॅचेस: सॉफ्टवेअर अपडेट ठेवा जेणेकरून कमजोरी दूर होईल. क्वांटम-सुरक्षित एन्क्रिप्शन विकसित करणे आणि जीरो ट्रस्ट मॉडेल अवलंबणे २०२६ साठी महत्त्वाचे आहे. **कायदेशीर आणि धोरणात्मक उपायामध्ये** भारत सरकारने IT कायदा मजबूत करावा आणि सायबर आतंकवाद, जासुसीसाठी नवीन कायदे आणावेत. राष्ट्रीय सायबर समन्वय केंद्र (NCSC) आणि सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल सक्रिय कराव्यात. जनजागृती आणि प्रशिक्षणासाठी सायबर सुरक्षा याचे शिक्षण शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावेत. **विविध संस्थांसाठी उपाययोजनामध्ये** संस्थांनी सायबर सुरक्षा धोरण तयार करावे. वैयक्तिक स्तरावरील वापरकर्त्यांनी संशयास्पद लिंक्स क्लीक करू नका आणि VPN वापरा. सॉफ्टवेअर अपडेट ठेवा आणि अँटीव्हायरस सक्रिय करा.

➢ **समुद्री सुरक्षा:**

आशिया खंडातील भारताचे स्थान व महत्त्व सागरी सुरक्षेच्या अंगाने अत्यंत महत्त्वाचे आहे. भारताला ७५०० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्र किनारा लाभलेला आहे. भारताच्या पश्चिमेला-अरबी समुद्र, दक्षिणेला हिंदी महासागर तर पूर्वेला बंगालचा उपसागर आहे. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर भारतीय संघराज्यातील अनेक महत्त्वाची व्यापारी बंदरे आहेत. पूर्व आणि पश्चिम किनारपट्टीवर भारतीय संघराज्यातील अनेक महत्त्वाची व्यापारी बंदरे आहेत. पूर्व किनारपट्टीवर ओडिसा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू तर पश्चिम किनारपट्टीवर गुजरात, महाराष्ट्र, केरळ, गोवा, कर्नाटक यासारखी प्रगत राज्ये वसलेली आहेत. भारतीय सागरी किनारपट्टीवरील मुंबई, विशाखापट्टणम,मार्मागोवा, कारवार, लक्षद्वीप इ. बंदरे आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत.भारतीय नौदल ब्रिटिशकाळापासून सागरी सुरक्षेची जबाबदारी सांभाळत आहे. तत्पूर्वी छ. शिवाजी महाराजांच्या काळात १६व्या शतकांत सागरी आरमाराची निर्मिती झाली आहे. छ. शिवरायांनी उभे केले जलदुर्ग व नाविक दल ही भारतीय नौदलाची पायाभरणी आहे. भारतीय नौदलाच्या सक्षमीकरणासाठी भारत सरकारने विशेष प्रयत्नांतून वाटचाल सुरू केली. भारताची सागरी संरक्षण सज्जता स्वदेशी प्रयत्नांबरोबर मित्रराष्ट्रांच्या मदतीवर उभारलेली आहे. रशिया, फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका यासारख्या तंत्रसमृध्द देशांनी भारताला नाविक साधन-साहित्य दिलेली आहेत. उदा. विमानवाहू युध्दा नौका, पाणबुडी. भारताच्या ९०% व्यापार समुद्री मार्गाने होतो, तरी चिनी नौसेनेच्या विस्तारामुळे भारतातील समुद्रमध्ये धोका वाढला आहे.  हूती हल्ले आणि पायरसी हे नवीन आव्हान आहेत.

- **ऊर्जा सुरक्षेसंबंधी समस्या:**

भारताच्या 'ऊर्जा सुरक्षा' संबंधी अनेक आव्हाने आहेत. भारताकडे ऊर्जाचे स्त्रोतात जीवाश्म इंधनावर पूर्णपणे ऊर्जा क्षेत्र अवलंबून आहे याचा परिणाम ऊर्जा निर्भयतेकडे जातो. कारण ही इंधने पुढील काही वर्षानंतर संपुष्टात येणार आहेत. यामुळे शाश्वत स्त्रोत शोधले पाहिजेत. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे भारतातील ऊर्जा स्त्रोतावर विपरीत परिणाम घडतो. कारण भारत ८०% नैसर्गिय तेल आयात करते. तसेच भारतात ऊर्जा वितरणात प्रगत तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे ऊर्जा गळतीची समस्या दिसून येते. या ऊर्जा समस्यामुळे ऊर्जा सुरक्षेसाठी धोरण आखले पाहिजे. ऊर्जाचे विविध स्त्रोतचा सहभाग व उत्पादन वाढवले पाहिजे. **ऊर्जा धोरण** प्रभावी अवलंबले पाहिजे. शाश्वत विकासासाठी स्वच्छ ऊर्जा व स्वतः ऊर्जाचे ध्येय निर्माण केले पाहिजे. तरच भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळते. राष्ट्रीय सुरक्षा व ऊर्जा वापरासंबंधी नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता याच्याशी निगडीत ऊर्जासुरक्षा असते. आधुनिक अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीत स्वस्त ऊर्जा मिळणे आवश्यक आहे आणि त्यासाठी प्रत्येक देश प्रयत्न करत असतो. पण ऊर्जाचे देशामध्ये असमान वितरण व पुरवठा यामुळे देशाला ऊर्जासुरक्षतेसंबंधी प्रयत्न करावे लागतात. ऊर्जा सुरक्षतेच्या माध्यमातून विकासाला चालना मिळते.

भारताच्या ऊर्जा वापराचा हिस्सा जगातील ऊर्जा वापराच्या ३.५% एवढा आहे. २०३१ पर्यंत तो १०% होण्याची शक्यता आहे. एकूण ऊर्जा निर्मितीत १०४८ अब्ज युनिट गरज होती. १२ व्यापंचवार्षिक योजनेत भारताने ८८५३७ मेगावॅट क्षमतेची गरज वाढवण्याचे लक्ष दिले. भारताने ऊर्जा सुरक्षाच्या दृष्टिने २००९-१० ला ७७१.५५१ मेगावॅट लक्ष होते तर आता २०१५-१६ ला ११०७.०२२ मेगावॅट लक्ष पूर्ण केले आहे. भारताने आपली ऊर्जा क्षमता वाढवली आहे. तसेच २००८ मध्ये कोळशावर आधारित वीज निर्मिती क्षमता ७६ GW वर नेण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. भारतात ऊर्जा स्त्रोतचे कोळसा हे मुख्य भंडार असून दुसरे थर्मल ऊर्जा आहे. भारताचे कोळशाचे साठे असले तरी आयातीचा पर्यायही स्विकारला आहे. तसेच तेल व गॅस, जीवाश्म इंधन. डिफेन्स स्पेस एजन्सी (DSA) आणि २०२३ चा सुरक्षा अंतराळ सिद्धांत हे उत्तर आहेत, पण गुंतवणूक वाढवावी लागेल. आर्थिक आणि ऊर्जा सुरक्षा राष्ट्रीय सुरक्षेत आर्थिक स्थिरता महत्त्वाची आहे. टॅरिफ वॉर, महागाई आणि जागतिक मंदीमुळे आव्हाने आहेत. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर (CPEC) मुळे भारताच्या

हितांना धोका निर्माण झाला. ऊर्जा सुरक्षेसाठी तेल आयातीवर अवलंबून असल्याने मध्यपूर्व तणाव धोकादायक आहेत. हरित ऊर्जा संक्रमण आवश्यक आहे.

मादक पदार्थ आणि मानव तस्करीस्वर्णिम त्रिकोण (म्यानमार) आणि अफगाणिस्तानमधील अफूजन्य पदार्थ तस्करीमुळे युवकांवर परिणाम होतो. हे दहशतवादाला फंडिंग करते आणि सीमा सुरक्षा कमकुवत करते. उपाययोजना आणि भविष्यातील दिशासरकारने राष्ट्रीय सुरक्षा धोरण स्पष्ट करणे, DCA आणि DSA सारख्या एजन्सी मजबूत करणे आणि स्वदेशी संरक्षण उत्पादन (DAP-2026) वर भर देणे आवश्यक आहे.  संयुक्त अरब अमीरातसारख्या देशाबरोबर सहकार्य वाढवावे. तसेच AI, सायबर लवचिकता आणि संयुक्त सुधारणा गरजेच्या आहेत. ही आव्हाने सोडवण्यासाठी बहुस्तरीय रणनीती हवी, ज्यात कूटनीती, तंत्रज्ञान आणि सामाजिक एकता महत्त्वाची आहे. अंतराळात चीनच्या ASAT चाचण्या आणि उपग्रह सैन्यीकरणामुळे भारताने मिशन शक्ति (२०१९) सारख्या पावले उचलली आहेत.

➢ **अण्वस्त्र प्रसार:**

भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर बदलत्या जागतिक परिस्थितीत अनेक प्रकारची आव्हाने निर्माण झालेली आहेत. आज राष्ट्रां-राष्ट्रातील युध्दाच्या व संघर्षाच्या पारंपारिक संकल्पनाही बदलत्या आहेत. आज थेट युद्धभूमीवर युद्ध न करताही एखादे राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचे अमर्याद नुकसान घडवून आणू शकते. आज आपण आपल्या दैनंदिन जीवनातील घटना घडामोडीकडे गांभीर्याने बघितल्यासअसे लक्षात येते की, आपल्याला पदोपदी अनेक संकटाना सामोरे जावे लागते. आज मानवी जीवन जितके प्रगत व तंत्रसमृध्द झाले तितकेच तणावाचे व स्पर्धामय बनले आहे. युद्ध किंवा हल्ला करण्यासाठी लागणारी पारंपारिक शस्त्रे साधने कालबाह्य होवून नवनवीन रासायनिक व आण्विक शस्त्रे तयार झाली आहेत. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राष्ट्रांकडे अण्वस्त्रे आहेत. १९४५ साली जपानवरील आण्विक हल्ल्यानंतर अमेरिकेच्या आण्विक शक्तीची जगाला प्रचिती आली. त्यानंतर रशिया, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, चीनसारखी राष्ट्रे ही अण्वस्त्रसज्ज बनली.

भारत आणि पाकिस्तान ही आशियातील दोन राष्ट्रे अण्वस्त्रसज्ज बनली आहेत. इराण व 3. कोरियाचे आण्विक प्रकल्प जागतिक पातळीवर वादग्रस्त बनले आहेत. पाकिस्तान काश्मीर प्रश्नावरून भारताला आण्विक युध्दाची धमकी दिली आहे. आज भारताकडे अण्वस्त्रे असली तरी भारताने आपला अणु ऊर्जा प्रकल्प हा वीजनिर्मिती व नागरी कारणासाठी स्थापित केला आहे. तसेच भारताने कोणत्याही राष्ट्राविरुध्द आपण प्रथम अण्वस्त्रांचा वापर करणार नसल्याचे घोषित केले आहे. तरीदेखील आज पाकिस्तानमधील लष्कर व धार्मिक कट्टरतावाद्यांनी तेथील दहशतवादी गटांशी असलेली सांगड लक्षात घेता आपल्या राष्ट्रीय सुरक्षेसमोर गंभीर स्वरूपाचे धोके निर्माण झाले आहेत. अमेरिका व उ. कोरिया दरम्यान आण्विक चाचणीवरून युध्दसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. युनो व इतर आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून आण्विक शस्त्रे नियंत्रणासाठी सातत्याने प्रयत्न चालू आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर आपण अण्वस्त्रे प्रासर व नियंत्रणाचा आढावा घेणार आहोत.

अण्वस्त्रप्रसार नियंत्रण म्हणजे दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांनी द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय कराराअंतर्गत अण्वस्त्रे स्पर्धा थांबवणे. अण्वस्त्रांच्या साठ्यामध्ये कपात करण्यासाठी केलेले प्रयत्न. अशा प्रकारचे प्रयत्न शीतयुध्दोत्तर काळात अमेरिका व रशिया दरम्यान चालू झालेत. आण्विक युद्धातील अमर्याद विनाश टाळण्यासाठी अमेरिका व रशिया दोन्हीं राष्ट्रांनीही अण्वस्त्रांच्या साठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला. या निर्णया अंतर्गत पुढील करार झाले. 1) 1963 Limited test ban Treaty, 2) 1967: Outer Space Treaty, 3) 1972 Anti-Ballistic Treaty, 4) 1972

Strategic Arms Limitation Treaty, 5) 1987 Intermediate Nuclear Forces Treaty अशा करारांबरोबर १९९१ साली अमेरिका व रशिया दरम्यान Strategic Arms Reduction Treaty करार होवून अण्वस्त्रांच्या साठ्यात ३०% कपात करण्याचा निर्णय झाला. १९९२ साली याच कराराच्या दुसऱ्या टप्प्यानुसार ही कपात ५०% पर्यंत पोहचली.

- **सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार-१९९६:**

शीतयुद्धोत्तर काळात अण्वस्त्रांचा प्रसार रोखण्यासाठी एक बहुपक्षीय पातळीवरील मोठा प्रयत्न घडून आला. सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार हा भविष्यातील अणुचाचण्या रोखण्यासाठी आहे. करारावर सह्या करणाऱ्या राष्ट्राला भविष्यात अणुचाचणी करता येत नाही. अमेरिकेत या करारावर स्वाक्षरी केलेली नाही. तर २००० मध्ये रशियाने या करारास मान्यता दिली आहे. या कराराबरोबर इतरही काही करार झालेले आहेत. १९७० सालापासून Nuclear non-proliferation Treaty (NPT) हा करार अस्तित्वात आला आहे. भारत वरील कराराचा सदस्य नाही.

अशा प्रकारे भारताच्या संरक्षण सज्जतेचा आढाव्यामध्ये ऊर्जा व सागरी क्षेत्राच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या उपाययोजना व संभाव्य धोक्याचा अभ्यास केला. आजही भारतातील संरक्षण यंत्रणेला निरनिराळ्या प्रकारच्या दहशतवादी कृत्यांना तोंड द्यावे लागत आहे. आपली संरक्षण दले उपलब्ध साधनसामग्रीनिशी आपले कर्तव्य बजावत आहेत. आज पारंपारिक युध्द, संकल्पना बदलून नव्या युद्धनीती बनल्या आहेत. आपल्यादेशाच्या वेगवान आर्थिक प्रगतीला खीळ बसावी. यासाठी शेजारील राष्ट्रांतील दहशतवादी गट सातत्याने सक्रिय असतात. दक्षिण आशियातील पाकिस्तान व भारत दोन्ही देश अण्वस्त्रसंपन्न असल्याने द्विपक्षीय संबंधात सतत तणावाचे व चढ-उताराचे प्रसंग येतात. पाकिस्तान वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन करत असल्याने काश्मीरमध्ये अप्रत्यक्ष व अघोषित युद्धसदृश्य परिस्थिती आहे.

☆ ☆ ☆